|| श्री ||

MARATHI FEATURE FILM

"DOUBLESEAT"

PURNA HONARYA SWAPNANCHI GOSHTA.

**DIALOUGES DRAFT 5.0**

STORY, SCREENPLY BY: KSHITIJ PATWARDHAN SAMEER VIDWANS

DIALOUGES BY: KSHITIJ PATWARDHAN

DRAFT FOR HEAD OF DEPARTMENTS AND PRIME ACTORS.

A MINUTE BEFORE YOU READ THE SCRIPT | स्क्रीप्ट वाचण्याआधी...

ही कथा सुचली, तेव्हा मनात आलेला विचार तुमच्याशी शेअर करावासा वाटला. हया सिनेमासाठी काम करताना, त्यांचा नक्कीच उपयोग होईल अशी आशा आहे.

सिनेमा हया माध्यमातून लेखक, जीवन पुन्हा एकदा रचतो. त्यातून निरनिराळया कथा मांडतो. दिग्दर्शक, कलाकार ती कथा पडदयावर जिवंत करतात. प्रत्येक कथा आपापलं एक जग घेऊन समोर येते. असंच एक जग या सिनेमाच्या माध्यमातून मांडण्याचा प्रयत्न आहे. ते आपल्या मध्यमवर्गीय माणसाचं जग आहे. त्यातली पात्र, घटना, नातेसंबंध साकारण्यामागे गेल्या काही वर्षांचं imagination, observation, hard work तर आहेच पण एक चांगला हेतू आहे.

हा हेतू, चांगली कलाकृती बनवण्याबरोबरच सर्वसामान्य प्रेक्षकाच्या जगण्यात बारीकशी भर घालण्याचा आहे. ही भर त्यांना स्वतःची स्वप्न पूर्ण करायचं बळ देईल, त्यांचा स्वताःबददलचा विश्वास आणखी ठाम करेल. नात्यांमधलं काव्य, त्यातली रसिकता पुन्हा एकदा अनुभवायला लावेल आणि "hope is a good thing, may be the best of things, and no good thing ever dies" या वाक्याप्रमाणे त्यांची आशा जीवंत ठेवेल.
हा भाबडेपणा नाही. सिनेमा पाहून झटकन माणसाचं परिवर्तन होत नाही, तसंच सिनेमा पाहून सगळेच आशावादी झालेत असंही होणार नाही, मात्र जगाच्या कुठल्या ना कुठल्या कानाकोपऱ्यात कधीतरी हा सिनेमा पाहून एखादया माणसाला पुन्हा प्रयत्न करावा वाटला तर ते या कलाकृतीचं यश असेल.

लेखक सिनेमा लिहीतो, दिग्दर्शक आपला सर्व अनुभव पणाला लावून कल्पकतेने सिनेमा घडवतो. निर्माता या सगळयाला पैसा आणि प्रोत्साहनाचं पाठबळ देतो. कलाकार मोठया ताकदीनं लेखकाच्या व्यक्तीरेखा त्याच्यापेक्षा जास्त उमजून करतात, त्यात आणखी गहिरे रंग भरतात. त्या व्यक्तिरेखा सशक्त, हाडामासाच्या बनवतात. छायांकन असो वा संगीत, आर्ट डिरेक्शन असो किंवा रंगभूषा, सगळयांनी समरसून केलेलं काम, सिनेमाची प्रत्येकचौकट, प्रत्येक क्षण चिरकाल जीवंत ठेवतं.

हा सिनेमा तसाच बनेल याची खात्री आहे. हा तुमच्या माझ्या सगळयांबददलचा सिनेमा आहे. आपण केलेले कष्ट, धडपड, पाहीलेली स्वप्न, मिळवलेली ओळख या बददलचा आहे. कितीही वेळा पडलो, तरी पुन्हा नव्याने उभ्या रहाणाऱ्या spirit बददलचा आहे. तेच spirit तुम्ही तुमच्या कामातून आणि Team म्हणून प्रेक्षकांपर्यंत पोचवाल याबददल शंकाच नाही. तुमच्या उत्तमोत्तम कलाकृतीमध्ये या सिनेमाचं नावं निश्चित घेतलं जाईल याची खात्री आहे.

या सिनेमाला आणखीन चांगलं बनवण्याऱ्या सर्व सूचनांच मनापासून स्वागत आहे.

आपले,
क्षितिज पटवर्धन , समीर विव्दांस

Black screen

Fade in

**"CHASE YOUR DREAMS, THEY DO COME TRUE"**

**-SACHIN TENDULKAR**

Fade out

1. Ext/ Day/ Exotic Location

सूर्योदय होताना दिसतो. एका निसर्गरम्य वातावरणातलं रिसॉर्ट दिसतंय. रिसॉर्टचा बोर्ड दिसतो. हनिमून स्वीट अशी पाटी गुलाबी अक्षरात लिहीलेली दिसते. हे सर्व अतिशय शांत आणि निवांत लयीत उलगडत जावं.

1A. Int/ Day/ Exotic Location

१. त्याच शांत लयीत, एका रुमला लागलेला डू नॉट डिस्टर्बचा बोर्ड दिसतो.
२. एका पांढऱ्या शुभ्र बाथटबच्या कडेला मंगळसूत्र आणि जेन्टस घडयाळ काढलेलं दिसतं.
३. टेबलवर उघडलेलं वॉलेट, एका बाजूला फॅमिलीचा फोटो. दुसरीकडे मूडस कॉंडमचं पाकीट.
४. मॅटवर त्याचे लांब सडकबूट आणि तिच्या छोटयाशा चपला ठेवलेल्या.
५. गॅलरीत सूर्यप्रकाश आणि वारा. दोन खुर्च्या समोरासमोर. समोर एकबिअर, एकचहाचा कप.
६. त्याची एका कुरीअर कंपनीची बॅग, शेजारी तिची बॅग, इन्शुरन्स कंपनीची. दोन प्लॅस्टीक पिशव्या
७. दोघं बेडवर एकमेकांच्या जवळ झोपलेले.
८. त्याचे डोळे उघडतात. तो काहीशा अनोळखी नजरेनी तिच्याकडे पहातोय. त्याचा हात तिच्या डोक्याखाली. तो अलगद सोडवायला जातो. तिची झोप मोडल्यासारखी होते. ती पुन्हा त्याचा हात घेऊन डोक्याखाली ठेवते.

*अमितः काय? कसं वाटतंय?*

*मंजिरीः फारच बाप!*

*अमितः निघायचं?*

मंजिरी नकारार्थी मान डोलावते.

*अमितः ते बघ तिकडे काये!*

ती उत्सुकतेने दुसरीकडे पहाते. अमित तिची पापी घेतो. ती लाजते.

Ext/ Day/ chawl

**TITLE SEQUECE ON A "LAWNI OF LIFE". SONG ESTABLISHING THE SPIRIT OF LIFE. CONTRAST TO FIRST SEQUENCE. IT SHOULD BE FAST, ENERGETIC AND EQUALLY SURPRISING LIKE CITY LIFE.**

संगमभाई चासकर सदन, मुंबई, स्थापना १९३० असा बोर्ड दिसतो. त्यावरुन काही कबूतरं उडतात. खाली एका खोलीत जुन्या घडयाळासमोर बसलेले आजोबा पेपर उघडतात, त्यात एक फोटो दिसतो. नळाच्या लाईनीचा.

खरीखुरी नळाची लाईन दिसते. समोर सहा सात भांडी. नळ चालू होतो. त्याबरोबर

कुकरची शिटटी वाजते. कॅमेरा वाफेसोबत वर. धूरासोबत खाली. उदबत्ती पेटवलेली दिसते.

कॅमेरा त्याप्रमाणे हलतो. उदबत्ती ठेवली जाते. समोर सिध्दीविनायक. कॅमेरा डोकंटेकवल्यासारखा.

समोर पार्श्वनाथ. कॅमेरा प्रदक्षिणा मारल्यासारखा समोर एकविरा आई.

रेडीओचं बटणं वाढवलं जातं. कॉमेंट्री सुरु होते, "इंडीयन बॅटीग लाईन अप"

त्या लाईन अप वरच एका घराच्या दारातून एका मागून एक अशी अकरा जण बाहेर पडतात.

कॅमेरा वरुन हलके तरंगत खाली येतो. पतंग इस्त्रीवाल्याजवळ पडतो.

तो शेजारी ठेवतो. स्प्रिंकलर उचलतो. पाणी मारायला ट्रिगर दाबतो.

एका चेहऱ्यावर पाणी फवारलं जातं. टॉवेल फिरवला जातो. नाव्हयाकडुन कटींग करुन एकजण उठतो. त्याने मुंबई इंडीयन्सचा शर्ट घातलाय आणि मागे तेंडुलकर लिहीलंय.

तो पोरांशेजारनं चालत जातो.

बॉल टाकला जातो. एकजण शॉट मारतो.

मंजिरी आणि अमित चाळीसमोरच टॅक्सीतन उतरतायत. टो बॉल रपकन तिच्या कपाळाला लागतो.

अमित बॉल घेऊन दुसरीकडे फेकून देतो.

हातात बॅगा घेऊन अमित आणि मंजिरी पाठमोरे चाळीसमोर उभे.

2. Int/Day/ Home

काकू एकटक टीव्ही पहातेय. आतून नारळ खोवल्याचा आवाज. एकदम ढणाढणा आवाज येतो. टीव्हीवर एक बाई दोन बायकांना एकत्र कानाखाली मारते.

टीव्ही आवाजः तिला जर त्रास दिलात, तर हेच होणार, असंच होणार! शिक्का!

*काकूः अहाहा! काय वाजवलीन बघ. असच पाहीजे, पोराच्या जेवणात तिखट टाकलन सटव्यांनी.*

मंजिरी त्याकडे पहात पहात कपाटासमोर येते.  कपाट उघडते. पहाते. तिचे कपडे ठेवायला कुठेच जागा नाही. अॅडजस्ट करुन बॅग ठेवायला जाते, मावत नाही. अमित येतो. बघून थांबतो. बॅगेतल्या चार चांगल्या साडया काढतो आणि त्या कप्प्यात ठेवतो. उरलेली बॅग कपाटाखाली सरकवून ठेवतो. रमाकांत मामा आतून येऊन बूट घालतो.

*रमांकातः ताई, हा मी निघालो हां. चल रे. चला वहीनी येतो. तुम्ही काय उदया निघताय?*

*काकूः हो.*

*रमाकांतः परत कधी?*

*आईः (आतूनच) ती राजापूरची गंगा आहे, दोन वर्षा आड येते फक्त.*

आई काठी घेऊन बाहेर रमाकांतच्या दिशेनी चालत येते.

*रमाकांतः ही काय? नवी बाय म्हणायची पध्दत?*

काकू हसते. आई वर ठकठकठक अशी तिनदा काठी मारते. मंजिरी आणि काकू प्रश्नार्थक पहाते.

*आईः  वरच्या मान्यांच्या विळीनी मान टाकली सकाळी. खवून दिलं दोन मिन्टात.*

अमित आरशासमोर टॉवेल लावतो. शर्ट इन करत आत जातो. वरुन दोनदा काठी वाजते.

*आईः  घ्या, आला मिस्ड कॉल. दोन मिन्टात येतायत.*

*अमितः (आतून) ऐ आई! पाण्याची बाटली कुठाय?*

*आईः (मंजिरीला) नशीब थोर, म्हणून कुरु घराण्यात आलीस!!*

*मंजिरीः (कुतूहलाने) आपण हस्तिनापूरचे आहोत ओरीजीनल?*

*आईः मग? बघीतले नाहीस कसे एकेक धृतराष्ट्राचे वंशज आहेत. सगळं समोर आहे, पण काही दिसत नाही. ओटयाखाली आहे बाटली. जा दे त्याला.*

मंजिरी आत येते, हातात पाण्याची बाटली घेऊन अमित उभा. तिला जवळ घेतो. ती ऑकवर्ड होते. आई उभी राहून सिरीयल बघतेय.

*मामा : (ओरडतो) पप्पू, मला मंत्रालयात प्लॅन सँक्शन करायचयेत. चल. पाणी ऑफीसमध्ये भर ना?*

*मंजिरीः ए पप्पू...(हसते.)*

अमित तिला चिमटा काढून निघतो. मंजिरी ओरडून हसते.

*काकूः काय झालं ग?*

*आई : (त्याच्याकडे बघत) जोक सांगितला असेल. नॉनव्हेज.*

अमित बाहेर येतो.

*काकूः सांग की आम्हाला पण!*

अमित हसत निघून जातो. आत मंजिरी एकटीच उभी राहून हसून लाजते.

3. Int/Night/ Home

संध्याकाळी बाहेर लावलेल्या लाईटच्या माळा काढल्या जातात. वडा तेलात सोडला जातो.

बाहेर सगळे बसलेत. काका, वडील, काकू, जयदीप मोबाईलवरच आहे.

*काकाः नाय हो, पोरांना अक्कल आहे तेवढी. आता हा, मला अकरावीत बोलला होता. सॉफ्टेअर, म्हणलं ते तर ते. त्यानीच ग्रुप जमवला, रोज त्यांचा अभ्यास चालतो, आता तर व्हॉटस अॅप वर पण गणितं सोडवतात आता बोला!*

सगळे बघतात. जयदीप फोनवरच मन लावून आहे. तो सगळयांकडे बघून हसतो.

*आईः (वडा काढत) चला, ताट घ्या.*

मंजिरी आणि काकू आत उठून जातात. वडील अमित काका उठतात. भाऊ मोबाईलवरच आहे. वडील खुर्ची फोल्ड करतात. अमित सतरंजी मुडपून घालतो. काकू आणून समोर तांब्या भांड ठेवते. वडील फोल्डींगचं टेबल उघडतात. लगबग चालू आहे. काकू परत येऊन पान मांडते. अमित वडील काका बसतात.

*काकाः ये रे आता बास झालं, किती करशील अभ्यास?*

जयदीप मोबाईलमध्ये बघत बघत पुढे सरकतो. मंजिरी आतून सांडशीनं पातेल घटटं धरुन येते. जयदीप उठतो. मंजिरीचं पूर्ण लक्ष पातेल्याकडे आहे. ती थोडी पुढे येते. जयदीप मोबाईल मध्ये पहातच पुढे येतो, मंजिरीला धडकतो. पातेल निसटतं. धाडकन पडतं. फोनही सटकून आमटीत पडतो. आमटी सगळीकडे सांडते. मधोमध राहीलेल्या आमटीत फोन तरंगताना दिसतो. त्यावर सनी लिऑनचा फोटो.

*आईः हया कोण? गणिताच्या बाई?*

जयदीप फोन उचलतो.

*वडीलः (विषय बदलायचा म्हणून) अगं, बघ की जरा इकडं तिकडं.*

*मंजिरीः (हळूच) मी बघीतलचं होतं.*

*वडीलः (अधिकारानी) बोलू नको, पाणी आण आधी!*

तिला गांगरल्यासारखं होतं. अमित तिला नजरेनी ठीक आहे असं सांगतो. तिच्या डोळयात पाणी येतं.

4. Int/Night/ Home kitchen

देव्हाऱ्यात ब्लू लाईट लागलेला दिसतो. मुसमुसण्याचा आवाज येतो. त्याच्या गॅप मध्ये घोरण्याचा. मंजिरी मुसमुसतेय. काकू घोरतेय. आई एकदम वळून पहाते तिच्या लक्षात येतं.

*आईः अगं ए, रडू नको. लोकांना वाटेल सासूनी हाणलं हिला पहिल्याच दिवशी.*

*मंजिरी रडता रडता हसते.*

*आईः अगं पातेल पडलं म्हणून कुणी रडतं का? माझ्या हातनं तर आल्याआल्या स्टो चालू राहीला होता एकतास, वर दूध ठेवलं होतं. आम्ही गेलो दोघं चौपाटीला. येईपर्यंत पार बासुंदीच. अगं अॅडजस्ट व्हायला दोन चार महिने जातातच. त्यात हयांना जरा टेम्पर लॉस आहे. पण तू काळजी करु नको काय? बिनधास्त झोप. गुड नाईट.*

*मंजिरीः गुड नाईट.*

*आईः स्वीट ड्रिम्स!*

मंजिरी हसते. डोळे मिटायला जाते. खाडकन आवाज येतो.

*आईः आणि उंदीर दिसला तर घाबरु नको. आपला घरातलाच आहे तो!*

मंजिरी चमकून पहाते. मेसेज वाजतो. ती मोबाईल पहाते. मेसेज आलाय. "झोपली का?"

4A. Int/Night/ Home

बाहेरच्या खोलीत मोबाईल बाजूला ठेऊन अमित डोळे उघडून पडलाय. वर थोडंसं. खराब झालेलं छत आणि फॅन दिसतो. बाहेर बाकड्यावर पोरं बोलतायत त्यांचा आवाज येतोय.

*१: मी तर बोलतो, पतंप्रधान हाय ना, तो एकदम क्लीन पायजे. एकदम स्वच्छ कॅरेक्टर.*

*२: नाय रे स्वच्छ काय तू पण हायेस. पंतप्रधान हाय ना, त्याला ना डायनामिक्स पायजे, म्हणजे त्याच्याकडे बघून वाटलं पाहीजे हा की नाय कोणाला पण झवू शकतो.*

*३: मग तर आपला रव्याही हू शकतो पंतप्रधान!*

सगळे हसतात. अमितही किंचीत हसतो.

*काका: परवा त्या एका हिरोला ॲक्सीडेंट झाला म्हणे तुमच्या इथं?*

*वडील: कसा नाही होणार? एकतर तो टिनपाट हिंदी पिक्चर. त्यात तो हि रो साहेबांचा मित्र. या अशा काखेत करवंटया अन मांडयात कलिंगडं. (अमितला चुकून हात लागतो.) साहेब म्हणाले नाईक याला इच्छा आहे. मी म्हणलं बाबा रे पोरगी नवीन आहे जरा दमानं चढ. तर मला म्हणला डोन्ट वरी, आय एम ट्रेन्ड. मी म्हणलं घे. करायला लागला मस्ती. घेतले पोरीनी दोन पाय वर. असा फेकला त्याला मागच्या मागं, सहा महिने हागायलाही बसता येणार नाही. उस्तादनी लगेच नाव ठेवलं "थ्रोविंग स्टार". मोठं लक घेऊन आलीये घोडी. सिझन गाजवणार बघा यंदा!*

अमित जवळचा मोबाईल वाजतो. तो पहातो. मंजिरीचा मेसेज आलाय. "नाही. पण गुड नाईट. स्वीट ड्रिम्स". तो मेसेज करतो "गुड नाईट थ्रोविंग स्टार".

दोन्हीकडे जागे मंजिरी आणि अमित दिसतात. दोघांनाही झोप येत नाहीये. लोकांच्या वेगवेगळे घोरण्याचे गप्पांचे आवाज चालूच आहेत.

Transition

Ext/Station/Day

गजबजलेलं स्टेशन दिसतं. ट्रेन दिसते. सगळे ट्रेन पकडतात. एकमाणूस शांत बसून आहे. त्याला जणू जायचंच नाहीये.

5. Int/ Day/ Dhananjay Home

दुसऱ्या एका घरात आरशासमोर टोपी चढवली जाते. युनिफॉर्मवर धनंजय मांद्रेकर असं नावं दिसतं. बत्तीशीच्या धन्या वळतो. त्याची बायको बाहेरुन आत येते.

*बायकोः आज लवकर?*

*धन्याः राष्ट्रपती येणारेत.*

*(आतून) आईः भेटले तर सांग, आमच्या आयीनी निरोप दिलाय.*

*धन्याः काय? चहा टाकलाय?*

*(आतून)आईः आमचे पगार वाढवा. कसं होणार बारा हजारात?*

*धन्याः आई तुझ्या हातात असतं तर तू हा प्रश्न घ्यून युनो मध्येही भांडली असती. बाकीच्यांचं कसं होतं?*

*बायकोः बाकीचे हुशार असतील पण!*

*धन्या (रागाने पहातो.): ऐ तू कटकट करु नको. तुला हात पाय दिलेत ना देवानी, ते हलव की जरा! डबा केलाय का आज तरी?*

6. Int/ Day/ Naik Home

डबा भरला जातो. बाहेर स्क्रीनवर यु टयूब वर एक मुलगा हिप हॉप नाचतोय.

*अल्पेशः (डोक्याला भले मोठठे पिवळे हेडफोन्स लावून ते बघत)*

*आय नो, आय नो, यू मिस मी.. बेबी कम बेबी कम अॅण्ड किस मी...*

*वडीलः डबा दया! आज काये?*

*अमितः (चहा पोळी खाताखाता) खरारा!*

आई त्याच्याकडे बघून हसते. मंजिरी शेजारनं काठी घेते. दोरीवरचे कपडे वाळत घालेत ते काढायला लागते. आई डब्यांची झाकणं लावून देते. वडील घेतात. अमित कप ठेऊन डबा घेतो.

*वडीलः आज मला लेट होईल, आज रेसची पहिली प्रॅक्टीस आहे.*

*मंजिरीः रेस? कुठे?*

*वडीलः चौपाटीवर! (मंजिरी ब्लॅंक! दोरीवरचे कपडे काढतेय.) अंग रेसकोर्स.*

*कुठला लागेल सांग बरं यंदा, सुपर डुपर, थर्स्टी पावर, जम्पींग जॅक का थ्रोविंग स्टार?*

ती नाव ऐकून दचकते, काहीतरी काढायला जाते, आणि अचानक एक ब्रा वडलांच्या डोक्यात पडतो. आई वळून पहाते. अमित थबकतो. वडील स्तब्ध. मंजिरी थबकते. आई समोर येते. वडील ब्रा डोक्यावरनं काढतात. आईला देतात. आई अमितला देते. अमित तिला देतो. ती ऑकवर्ड होऊन बाथरुमकडे जाते. आई पाणी काढते. ती बादली आत घेऊन जाते. दाराच्या फटीतून पहाते. अमित तसाच निघून जाताना दिसतो.

*आईः आज देवपूजा करशील का? आणि चार वाजता शिंदयांनी बोलवलंय हां. सगळयांना भेटायचंय तुला...*

7. Int/ Day/ Shinde Home

कॉम्प्युटरवर एका गेमची न्यू लेवल दिसते. शिंदेच्या घरात सपना चिडून उभी आहे. अमितची आई लहान मुलासारखी गेम खेळतीये.

*आईः उडी कशी मारायची गं? जे का जे?*

*सपनाः (रागाने) कंट्रोल जे. मला रेस्युमी टाईप करायचाय. इंटरव्यू आहे.*

*आईः करशील गं! आणि लाथ, लाथ?*

*सपनाः मला बसू दया ना नाईक काकू.*

*आईः फार वेळ कॉम्प्युटर समोर बसू नये, डोळे खराब होतात. मधून मधून मोठ्यांनाही बसू दयावं.*

समोरुन बायका येतात.

*१ः मी म्हणलं नाईक बाई सुनेची ओळख करुन देतायत का नाही? का लपवून ठेवतायत?*

*आईः सुन म्हणजे काय तुमचं वय आहे का लपवायला? दया टाळी!*

सगळया हसतात. आतून सरबत आणलं जातं.

*आईः (मंजिरीच्या पाठीवर हात ठेऊन) रोहयाची आहे, कोकणातलीच. वडील एसटी मध्ये आहेत आणि आई डबे करते. ही बी कॉम झालीये, पण एल आय सी एजंट आहे तिकडची.*

*मंजिरीः एल आय सी नाही फ्युचर प्रोटेक्ट लाईफ इन्शुन्स.*

*आईः तेच गं म्हणजे एल आय सीच. (सगळयांना) दोन नंबर ची एजंट होती. एक नंबर नाही झाली कारण टू व्हीलर नव्हती. (प्रेमानी) हो ना गं? बिचारी!*

*१ः आम्हाला नको हां पण पॉलिसी, नायतर गोड बोलून गळयात मारायचात.*

सगळया हसतात. हसून होतं.

*मंजिरीः सगळयांच असंच होतं. सगळयांना वाटतं पॉलिसीवाले दिसला माणूस की हात धरुन मागे लागतात. पण आम्हाला काळजी असते ती कोणाला कळत नाही. वर्षाला एक पॉलिसी करुन आम्हाला किती मिळतात? हजार बाराशे? त्यात ऑफीसला दहा खेपा आम्हीच मारतो. प्रिमियम भरतो, पावत्या आणून देतो. आमच्या पेडणेकर काकू, सेम टोचून बोलल्या होत्या. मी मागे लागून पॉलिसी काढली. चौथ्या दिवशी हार्ट अटॅक आला. टोटल खर्च मिळवून दिला. रिक्षाचे पैसे भरले त्यांनी फक्त. महिना पाचशे रुपयात चार लाखाचं कव्हर असेल तर कोणाला नकोय. आणि इथं तर जीवाला किती धोका आहे. बॉम्बस्फोट काय, पूर काय,*

*चिकन गुण्या काय, मलेरिया, परत सतराशे साठ टेंशन आहेत. वजनं वाढलेली आहेत. हार्ट वर प्रेशर येतं त्याचं, आपण कसंही खातो...*

एक बाई चकली खाता खाता थांबते.

*मंजिरीः घ्या ना तुम्ही (१ ला) तुमचं नावं काय?*

*१: पेडणेकर*

*मंजिरीः कोलेस्टरॉल चेक केलतं का एवढयात?*

*१: घेऊन ये तू पॉलिसी का काय ते. बघू आपण.*

*मंजिरीः (स्माईल) पण मघाशीच तुम्ही म्हणालात ना, तुम्हाला नकोय. मग कशाला?*

आई तिच्याकडे प्रचंड अभिमानाने पहाते. तिला खांदयावर टॅप करत रहाते. मागे विजयी मुद्रेचं संगीत वाजत रहातं.

8. Int ext / Night/ Muley home, corridor, Naik Home

घडयाळ दिसतं. अमित ते नीट करतोय, मागे आजोबा आणि सपना हयांच्यात संवाद चालू आहे.

*अमितः ओ पांढरे मुळे, हे दया आता भंगारात, संपलं याचं लाईफ*

*आजोबाः ज्या दिवशी याचं लाईफ संपणार, त्या दिवशी माझं पण.*

*अमितः (हळूच) तसंही तुमचं सेमच आहे, दोघांनाही किल्ली बसते. एखाद दिवशी घेतो काढून बघू काय होतंय.*

एक पार्ट बसवतो. ते सुरु होतं. तो काच लावतो.

*अमितः येऊ का? का अजून आहे काही?*

*आजोबा (त्याचा हात धरत): मी तुला बोअर होतो ना? खरं सांग!*

*अमितः अहो...*

*आजोबाः संजूला पण होतो. म्हणून तर तो तिकडं अमेरिकेला असतो. जाऊ दे वाटीत आलेपाक आहे तो घेऊन जा. (सपनाला) सो, डिस्क्राईब युअरसेल्फ ?*

*सपनाः माय नेम इज सपना यादव आय एम २१. माय फादर रन्स अ लाँड्री. माय मदर इज अ हाऊस वाईफ, आय हॅव डन माय ग्रॅज्युएशन इन कॉमर्स, अ‍ॅण्ड वन इयर डिप्लोमा कोर्स इन मार्केटिंग.*

*आजोबाः व्हॉट इज युवर ड्रिम?*

अमित ते ऐकत आलेपाक घेऊन तोंडात टाकतो. टोल पडतात. अमित बाहेर येतो. त्या टोलांवरच तो व्हरांडयातनं चालतोय. खाली येतो. बाहेर अल्पेश बाकडा गँग बरोबर गप्पा मारत बसलाय.

*१: हा बघितला का? थ्री जी! नुसता टच केला तरी आदमी सापसूप गुल होतो.*

*२: आता टवेल जी येणाराय कळलं का?*

*३: आमचा दिप्या बोलतो, हे अलोक नाथ ने चालू केलेलं दिसतंय, सगळयाच्या मागे जी हाय ना!*

सगळे हसतात. अमित शेजारनं जातो.

*रव्याः अमित दादा येतो का बाकडयावर झोपायला?*

*अमितः हो. तुझं लग्न झालं की आपण एकत्र बाहेर झोपू! काय बोलतो? मस्त चांदनी रात मे, दिया तेरे हात मे!*

टाळी देतो. पुढे जातो.

*अल्पेशः अरे हा गेम डाऊनलोडच होत नाहीआय. काय घटीया आहे रे, पुन्हा करतो का एकदा?*

अमित आत येतो. बाहेरच्या दाराला कडी घालतो. समोर झोपलेल्या मंजिरीकडे पहातो. ती त्याच्याकडे पहाते. तो मधल्या दारापाशी जातो. मधल्या दाराला कडी लावावी का नाही या विचारात आहे, शेवटी हळूच कडी लावतो. बॅगेतून हळूच डिओ मारतो आणि लाईट बंद करतो. मंजिरी शेजारी येऊन झोपतो. स्वतःचा हात तिच्या डोक्याखाली देतो. पदर हळूच बाजूला करतो.

*अमितः  दुपारी मेसेज करतेस मला, जंम्पींग जॅक म्हणून? मी जंम्पीग जॅक आहे?*

*मंजिरीः (लाजून) हो.*

*अमितः (जवळ जातो.) अजून काय काय आहे मी?*

*मंजिरीः आले पाक! (हसायला लागते.)*

अल्पेश व्हरांडयात येऊन थांबलेला दिसतो. बाहेर बाकडयावर पडतो. आणि मोबाईलवर गेम सुरु करतो. अमित मंजिरीला जवळ ओढणार एवढयात

*अल्पेशः आई झवलान, एक नंबर गेम आहे आपल्याकडं! आज घेऊनच टाकतो.*

मंजिरी एकदम सावरते. वळते, समोर पहाते खिडकीच्या फटीतून अल्पेश दिसतो. अमित तिला हात लावायला जातो.  ती त्याचा हात पोटावर ठेवते. आणि खुणेनीच नाही असं सांगते.

अमित चरफडत वर पहातो. त्याला खराब झालेल्या छतात फॅन फिरताना दिसतो. मागे अल्पेशच्या खेळण्याचे आवाज येत रहातात.

9. Int/Evening/Amit office

ऑफीसमध्ये अमित शेवटचं कुरीअर टाकतो. समोर मॅच चालू आहे. तिथे सगळे जमलेले. अमित शांतपणे बॅग उचलतो. चेन लावतो. शेजारचा पाटील डोळे मोठे करुन पहातोय.

*अमितः चला पाटील!*

*पाटीलः (टीव्हीकडे बघत) थांब रे! सहा बॉल बारा पाहीजे! मी आरामात निघणारे.*

*अमितः डोळे आत घे, नायतर पडतील. आणि जिंकलो मॅच तर उदया प्रत्येक कुरीअर मागं दहा रुपये जास्त देणारेत का सगळयांना?*

*पाटीलः बाय!*

अमित निघायला लागतो. बॉस समोर येतो.

*बॉसः अर्जंट चारसौ आम की टोकरीयाँ है. कल शाम तक डिलीवर करनी है.*

*अमितः उदया सकाळपासनं.*

*बॉसः आजसे कर ना, क्या फर्क पडता है?*

*अमितः आठ वाजले आता.*

*बॉसः हनिमून एक दिन एक्स्ट्रा छुटटी मैने दिलवाई है.*

*अमितः मी पण तीन वर्ष रात्री दहा पर्यंत डिलीवरी केलीये.*

*बॉसः बोनस था तो मैने सोचा. करेगा तू. कर दो यार, चलो. और वो डिलीवरी ठीक से हो रही है ये भी चेक करो.*

*अमितः सर, मी डिस्पॅच मॅनेजर आहे, डिलीवरी बॉय नाही.*

*बॉसः हां तो घर जाके डिलीवरी करने को बोला क्या मैने? तू तेरा काम तो शुरु कर.*

मागच्या आवाजावरनं कुणीतरी बोल्ड झाल्याचं कळतं. बॅकग्राऊंडला आवाज येतात.

*१ः हा बहुतेकना देतो कॅप्टनला, याला कशाला ठेवलाय टिममध्ये?*

*२ः ये स्लो डिलीवरी तो मै भी खेल सकता था.*

*३ः अरे, हा चूतिया बघ, हरुन जाताना कॅमेऱ्याला बाय करतोय. बडवा हयाला तिच्या आयला.*

*अमितः ओ, मुंबई इंडीयन्स, या कामाला, उदया पेटया पोचवायला ते नाही येणारेत. क्रिकेटनी ना पब्लिकला पार चूतिया बनवून टाकलंय, चला! काय पाटील हरलात का?*

पाटील गायब आहे. अमित स्वतःशीच हसतो. पेटयांचा ट्रक उघडला जातो.

## 10. Int/Night/ Home

घाईघाईत दार वाजतं. लाईट लावला जातो. मंजिरी लाईट लावून दार उघडते. अमित घाईघाईत येतो. बॅग ठेवतो.

*अमितः (हलक्या आवाजात) चल. चल. आवर. फिरायला जायचंय.*

*मंजिरीः आत्ता? (स्वतःकडे पहात.) मी कशी आहे?*

*अमितः (कपाटाखालनं ब्रीफकेस काढतो. ड्रेस देतो) घाल पटकिनी.*

*मंजिरीः (त्यातही) हा नको. (तो ठेवून दुसरा काढते.) तिकडे बघ.*

अमित वैतागून दुसरीकडे पहातो. दाराला तोंड करुन उभा आहे. अचानक मधलं दार उघडतं. अमित दचकतो. आई बाहेर येते. मंजिरी तसाच अर्धवट ड्रेस बदललेला दचकते. आई दुसरीकडे पहाते. ती ड्रेस बदलते.

*आईः बाहेरनं येताय का?*

*अमितः चाललोय.*

*आईः आत्ता?* (घडयाळाकडे पहाते.)

*अमितः जरा बोलायचंय.*

*आईः इथं बोला की, आम्हाला एकदा झोप लागल्यावर डायनॉसॉर आला तरी प्रॉब्लेम नसतो.*

*अमितः (अधिकाराने) तुला काय प्रॉब्लेम आहे? तू झोप ना.*

*आईः तिचा विचार कर, दिवसभर पायाचे तुकडे पडलेत मसाला मार्केट मध्ये फिरुन.*

*हे रात्री बेरात्री तिला उठवून बाहेर जायचं बरं आहे का? आणि तू बोल की त्याला!*

*मंजिरीः नको जायला.*

*आईः मग? त्या पेक्षा सकाळी उठून फिरायला जात जा, पंधरा मिन्टावर पार्क आहे. चांगल्या दहा बारा राऊंड मारा.*

*अमितः आई जा तू झोप. नाही जात आम्ही.*

आई त्याच्याकडे आणि मंजिरी कडे पहाते. दार लावून आत जाते.

*अमितः (आणखी जोरात खुणेनीच) चल तू!!*

*मंजिरीः नको.*

*आईः (पुन्हा दार उघडतं) जाऊ नका हां!*

दार बंद होतं. अमित निराशेनं मंजिरी कडे पहातो.

10A. Int/Night/ Home

ती झोपलेली दिसते. तो उठून फॅनचा स्पीड वाढवतो. वाढत नाही. ती फॅनकडे पहाते. तो निराशेनी तिच्याकडे पहातो. हताशपणे शेजारी येऊन झोपतो.

10B. Ext/Morning/ Chawl

अमित दात घासत गॅलरीत येतो. बनियन आणि टॉवेल वर आहे. कठडयाला टेकून पहातो. त्याला मंजिरी टॉयलेटच्या लाईन बाहेर उभी दिसते. तो तिच्याकडे पहात रहातो. त्याला आणखी वाईट वाटतं.

10c. Int/Morning/ Chawl

वडील दारासमोरच टॉवेल सोडतात. अंडरपँटवर उभे आहेत. बाहेर मंजिरी ऑकवर्ड होऊन इकडे तिकडे पहातेय. वडील पँट चढवतात. अमित तिच्याकडे पहातोच आहे.

11. Int Ext/Day/ Amit Office Railway station

अमित मंजिरीच्याच विचारात आहे. पेटया डिस्पॅच करतोय. त्याला फोन येतो. तो उचलतो. ती पलिकडुन जोरजोरात रडतेय.

*अमितः (घाबरुन) काय गं काय झालं?*

स्टेशनवर उभी मंजिरी दिसते. रडतेय.

*मंजिरीः (समोर पहात रडत) मी ए ना आत्ता रेल्वे टी स्टॉल समोर उभी आहे! एजंट रजिस्ट्रेशन करायला चर्चगेटला चालले होते. आई बोलल्या घे देवाचं नाव अन पकड ट्रेन! म्हणून पकडली (रडते.) पण आत्ता एकदम सगळया बायका अंगावरच आल्या. मी चेमटले.*

*अमितः आई पण ना महान आहे. आत्ता कुठाय तू?*

*मंजिरीः बांद्रे.*

*अमितः (स्वतःशी) व्वा! (तिला) हां जास्ती लांब नाहीये. उलटीकडे जा, चर्चगेट स्लो पकड. पकडशील ना? मला फोन कर पोचलीस की.*

*मंजिरीः हो.*

*अमितः (खाजगी आवाजात) ऐक ना जानू...*

*मंजिरीः ठेऊ का? ट्रेन आली. मी करते फोन.*

फोन कट करते.

11A. Int/Day/ Amit Office

अमित काळजीत बसलेला दिसतो. त्याला काळजी वाटते. स्वतःच फोन करतो.

फोन उचलला जात नाही. अमित आणखी काळजीत पडतो. शेजारनं एक पेटी सरकवतो.

11B. Int/Day/ Amit Office

शेवटची पेटी जाते. अमित वळून डेस्कबाहेर येतो. फोन लावलेला. फोन उचलला जातो.

*अमितः पोचली ना गं? आँ? आलो की तुला जवळ ओढतो आणि कम्प्लिट नकाशा सांगतो मुंबईचा. काय बोलते?*

पलिकडनं जोरजोरात हसण्याचा आवाज येतो. अमित फोन कट करतो.

12. Int Ext/Day/ Home corriodr

मंजिरी टॉवेलला तोंड पुसून बाहेर येते. समोर विशीची ढिम्म मुलगी गाऊन मध्ये फोन घेऊन उभी.

*मंदाः वयनी, दादा बोल्लाय आला की जवळ ओढणाराय. ही हा हा.*

*मंजिरीः (फोन काढून घेत.) तू कोणेस?*

*मंदाः मंदा, टोटल नाव मंदाकिनी. पप्पांना आवडते ना.*

*मंजिरीः त्यांना टुनटुन नाही का आवडत?*

*मंदाः (मंदपणे) नाय ती ओल्ड आहे ना, आज्जीला आवडते.*

*मंजिरीः (सरेंडर होऊन) कॉलेज बिलेज ला जातेस का नाही?*

*मंदाः झालं! अभी अपना पार्लर है, कालाचौकी मै, सिंड्रेला करके. आओ ना कभी. थ्रेडींग वॅक्सींग. ककुम्बर स्क्रब,प्रिन्सेस फेशियल, सब आता है अपने को.*

*मंजिरीः हं. आती है कभीकभी.*

खालनं तीनदा हॉर्न वाजतो. मंदा खूश होते.

*मंजिरीः काय गं?*

*मंदाः (खूश होऊन) ओ माय गॉड. ही हॅज कम.*

*मंजिरीः (लाडाने) काय? कोण आहे?*

परत खालनं तीनदा हॉर्न वाजतो.

*मंजिरीः (आणखी लाडाने) आँ? ट्रक आहे वाटतं त्याचा?*

मंदा लाजून पळून जाते. मंजिरी बाहेर येऊन डोकाऊन पहाते. रव्या बाहया वर करुन मंदाकडे पहात तीनदा गॉगल वर खाली करतो. मंदा लाजून पळून जाते. तो ही वळून जातो. मंजिरी जोरजोरात हसायला लागते. वळून आत जाणार, एवढयात घोडयाच्या टापांचा आवाज ऐकू येतो. ती दचकून मागे पहाते. वडील चक्क घोडयावर बसून आत येतात. मंजिरी अवाक होऊन खाली जाते. वडील उतरतात.

*वडीलः बघितला का माझा एन्शियन्ट वॉरिअर? दुरुस्तीला बाहेर काढला होता. (प्रेमाने हात फिरवत) हात लावायचाय का? लाव. प्रेमानी लाव.*

मंजिरी घोडयाच्या कपाळावर हात फिरवते. तिला एकदम वेगळचं वाटतं.

*वडीलः चहा टाकते का? पिऊन जातो, दहा मिन्टात.*

*मंजिरीः हो! पण हा?*

वडील सगळया गाडयांमध्ये घोडा लावतात. गाडयांच्या मधोमध एन्शियन्ट वॉरीयर उभा दिसतो.

13.  Int/ Afternoon/Home

चहाचा कप ठेवला जातो. अभी ना जाओ छोडकर गाणं मागे सुरु आहे. मंजिरी चहाचा घोट घेऊन हसत  मोबाईल काढते. एक ओळ टाईप करते, एन्शियन्ट वॉरीयर, अभी न जाओ छोडकर. गुणगुणते आहे. अमितचा रिप्लाय येतो के दिल अभी भरा नही. ती लाजून हसते. अजून एक ओळ पाठवते. सितारे झिलमिला उठे... त्याचा रिप्लाय येतो, चराग झगमगा उठे... तिचा मेसेज जातो अगर मैं रुक गयी अभी!

एवढयात आई ओढत ओढत सिलेंडर घेऊन येते. मंजिरीची तंद्री भंग होते.

*आईः दोन पोरं आहेत पण एक कामाचा नाही. आत घे घं जरा.*

मंजिरी लगबगीनी धावून सिलेंडर घेते. रोल करत आत न्यायला लागते. मागे गाण चालूच आहे.

*आईः अकराशे रुपयाला एक सिलेंडर, या गर्व्हमेंट वाल्यांच्या डोक्यात घातले पाहीजे.*

मंजिरी सिलेंडर आत ठेऊन बाहेर येते. मोबाईल घेते. आवाज कमी करते.

*आईः जरा लाव ना तो, चहा टाक अर्धा?*

*मंजिरीः करते. (आत जायला निघते.)*

*आईः दूधाची पिशवी फोडायला लागेल.*

मंजिरी आत जाते. बाहेरुन तिनदा काठी वाजते.

*आईः अर्धा वाढवं ग, माने वहीनी पण येतायेत.*

मंजिरी  शांतपणे सिलेंडर जोडते. गॅस चालू करते. झपकन आवाज येतो. बाहेर घरटे माझे तुझ्या अंगणात सिरीयलचं गाणं ऐकू येतं. अमितचा मेसेज येतो, अधूरी प्यास छोडके? पुढे? ती टाईप करते "घरटे माझे तुझ्या अंगणात."

14. Int/ Night/Naik Home

टीव्हीवर एका मुलीला मेकअप केला जातोय. मंजिरी त्या कडे निरखून बघतेय. अमित शेजारी बसलेला आहे.

*मंजिरीः जीन बघितली का?*

*अमितः तेच बघतोय मी अर्धा तास. ऐकतर मी काय म्हणतोय ते.*

*मंजिरीः पटकन बोल, ब्रेक संपायला अर्धाच मिन्टच आहे.*

अमित काहीही न बोलता तिच्या हातावर पैसे ठेवतो. ती त्याकडे पहाते.

*अमितः इन्सेन्टिव्ह. चारशे पेटया पोचवल्या व्यवस्थित.*

*मंजिरीः आता?*

*अमितः माथेरान. शनिवार रविवार. दोन दिवस, तुला मुंबई व्यवस्थित समजावतो म्हणजे रडून फोन यायचा नाही.*

*मंजिरीः जाऊया जाऊया. (पुन्हा टीव्हीत बघते. अमित रिमोट घेतो आणि टीव्ही बंद करतो.)*

*अमितः ब्रेकघे की जरा.*

मंजिरी हिरमुसून टीव्ही बंद करते.

*अमितः ऐक ना, तुझ्या मोबाईलवर दुपारचं गाणं आहे का?*

*मंजिरीः अभी न जाओ? आहे.*

*अमितः मी हेडफोन आणतो. आपण पडून ऐकूया. कोण कोणची आहेत?*

*मंजिरीः अरे एकदम मस्त आहेत...तेरे बीना जिंदगी से, आनेवाला पल, लग जा गले.*

*अमितः ऐकूया?*

*मंजिरीः (एक्साईट होते. सावरुन झोपते.) आण आण. आणि फॅन वाढव.*

अमित शेजारनं उठतो. हेडफोन घेतो. फॅन मोठा करतो. थाड थाड थाड आवाज येतो. फॅन आणि छताचा खराब झालेला थोडासा भाग तो झोपणार होता तिथं जोरात पडतो. मंजिरी किंचाळते. अमित ओरडतो. माती पडते. खोली भर धूळ होते. पूर्ण शांतता.

14A. Int/ Night/Naik Home

मंजिरी आत घाबरुन बसलीये. समोर फॅन, दोन तुकडे झालेला. मागे बुर्जीच्या गाडीचा आवाज येतोय. अमित बाहेर येतो. वडील आणि एकदोन जणं उभे आहेत.

*वडीलः नाही नाही आता पॅकच करुन टाकणारे ते कायमचं. कन्स्ट्रक्शन जुनं आहे ना आपलं. बघतो मी. बरं झालं आलात पण. चहा करायला सांगू का अर्धा?*

*१ः नको नको.*

*वडीलः अर्ध्या कपाला काय होतंय?*

*२ः राहू दे नाईक!*

सगळे निघतात. आई बाहेर येते. अमित शांतपणे उभा आहे.

*आईः जा रे तू आत झोप.*

*वडीलः आत? तू काय घाबरलास का रे? असं तर आमच्या अंगावर काय काय पडलंय!*

*आईः रात्री दीड वाजता सांगणारात का? जा, तू आत जा, तिच्याकडं बघ.*

अमित आईकडे पहात आत निघून जातो.

14B. Int/ Night/Naik Home

अमित आतून दार लावतो. मंजिरी डोळे उघडून पडलेली आहे. दाराला कडी लावायला जातो आणि त्याच्या लक्षात येतं की आतून कडीच नाहीये. आणखी वैतागतो. रुमाल लावतो. मग खलबत्ता घेऊन लावतो. मग मिक्सर ठेवतो. तिच्या शेजारी जाऊन गादीवर बसतो. समोर फॅन पडलेला.

*अमितः सॉरी हां! आपण नेक्स्ट मंथ जाऊ.*

मंजिरी सुन्न बसून आहे. बाहेरनं आवाज येतो.

*वडीलः (बाहेरुन) झोपा आता.*

*अमितः कायमचे झोपवा आम्हाला.*

ती शांतपणे त्याचा मोबाईल घेते. सायलेंट वर करते. स्वतःचा मोबाईल घेते. सायलेंट वर करते. त्याला मेसेज करते "मला जवळ घे. भीती वाटतीये." तो मोबाईलवर पहातो. तिच्याकडे पहातो. तिला जवळ घेतो. तिच्या डोक्यावरनं हात फिरवून पापी घेतो. तिचा स्क्रीन उजळतो "बरं वाटतंय?" ती मान डोलावते. तो तिला खुणेनीच मेसेज करायला सांगतो. ती मेसेज करते. हो. दोघं पडतात. तो हेडफोन्स काढतो. तिच्या मोबाईलला लावतो. गाणं सुरु करतो. दोघांच्या एका कानात गाणं आहे. आणि अंधारात स्क्रीन एका मागून एक उजळलेले दिसतात. "लग जा गले" गाण्यावर रात्रभर किचन मधून एका मागून एक मेसेजेस ब्लिंक होताना दिसतात.

SMS SEQUENCE

*सकाळी मंजिरी कठड्याशी ब्रश करत उभी आहे. मेसेजचा टोन वाजतो.*

*अमित (आवाज): एय...दोन दात बाहेर काढून हास ना फक्त. हास हास... तुझी फेस व्हॅल्यू वाढेल.*

मंजिरी तशीच तोंडाला पेस्ट लागलेली जोरजोरात हसताना दिसते.

अमित ऑफीसमध्ये कुरीअर सॉर्ट करतोय. मेसेजचा टोन वाजतो.

*मंजिरी (आवाज): काल इस्त्री करुन आणलेली काळी पँट घातलीये का? बहुतेक चेन तुटलीये त्या पँटची. आणि आत जर निळया रंगाची असेल तर त्याला एक भोक पडलंय आधीच.*

अमित दचकून पार्सल खाली धरतो. बघतो त्यानं ग्रे कलरची पँट घातलीये.

मंजिरी घरात वाढतीये. मेसेजचा टोन वाजतो.

*अमितः तू वाढताना मी डर्टी पिच्चरचा विषय काढला की समजायचं एवढं वाकायचं नाही.*

सगळे जेवतायत.

*अमितः बाबा डर्टी पिक्चर बघीतला का? काय काम केलंय त्या हिरॉईननी.*

ती लगेच ओढणी सरळ करते.

अमित घराखाली कोपऱ्यात उभा आहे. मेसेजचा टोन वाजतो.

*मंजिरीः आजचं एवढं काय जगावेगळं दाखवायचंय?*

15. Ext/ Night/Marnie Drive

चांदण्या रात्रीतली मुंबईची स्कायलाईन दिसते. रम्य. स्वप्नवत. वारा. शांतता. अमित आणि मंजिरी कठडयावर येऊन बसतात.

*अमितः कसं वाटलं?*

*मंजिरीः (एक्साईट होत.) सेम आहे, सेम. घरटे माझे तुझ्या अंगणात मध्ये सेम असचं दिसतं.*

अमित हसायला लागतो.

*अमितः तुम्ही बायका त्या सिरीयल बघून पागल होणारात एक दिवस.*

*मंजिरीः हसू नको हां. आपली आवडती सिरीयल आहे. आपला आधीचा मुहूर्त मी बदलला होता आठवतंय ना? त्या दिवशी महाएपिसोड होता.*

*अमितः (उडलाय) खोटं बोलतेय ना तू?*

*मंजिरीः (हसते.) ऑबियस. काय सिरीयल आहे पण. असं आठ खोल्यांचं घर, व्हेज नॉनव्हेज किचन सेपरेट. असा मोठ्ठा बाथटब. मराठी सिरीयल मध्ये पहिल्यांदा बाथटब दाखवलाय. असं घर पाहीजे.*

*(शांतता)*

*मंजिरीः ऐकना, या लोकांनी पण कधीतरी रस्त्यावर बसून असं बोललं असेल ना? मी तर ऐकलंय शाहरुख इथं असा रात्री उभा राहून ओरडला होता "गौरी तेरे लिये इधरीच घर बनाऊंगा"... बांधला ना जन्नत!*

*अमितः मन्नत नाव आहे त्याच!*

*मंजिरीः कसलं भारी ना पण ! लोकं येतात कुठनं कुठनं. ना आगापिछा, ना बॅकींग, ना पैसे, ना जवळची लोकं, पण सॉलिड काहीतरी करतात.*

*अमितः बाहेरनं असंच वाटतं. सगळे सक्सेसफुल नाही होत.*

*मंजिरीः सगळे अपयशी पण होत नाहीत.*

*अमितः फेल्युअर आलं की तुटतात लोक. कायमची.*

*मंजिरीः कोण तुटत नाही? सगळे तुटतात. परत उभ रहायचं पण. त्यात काय?*

*अमितः एवढं सोप्प नसतं.*

*(शांतता)*

*मंजिरीः तुला माहीतेय मला मुंबईच्या मुलाशी लग्न कराय होतं. मुंबईत यायचं होतं. मला भारी वाटतंय आत्ता इकडं बसून.*

*अमितः आवडलेली का मग?*

*मंजिरीः आवडायला आधी कळू तर दे.*

*अमितः कळायचं काये?*

*मंजिरीः अरे किल्ला नाही त्याला फोर्ट म्हणतात, त्या सायनच्या बाहेर शीव का लिहीलंय माहीत नाही. व्हीटी आणि सीएसटी एकच तरी नावं वेगवेगळी. इस्ट कुठलं वेस्ट कुठलं काही कळत नाही. लोकल जाणारी कुठली येणारी कुठली दोन्हीकडनं सारख्याच दिसतात. बांद्रयापुढं रिक्षा नाही एकाला तरी माहीतेय का का?*

*अमितः बरचं कळलंय की.*

*मंजिरीः तसं नाही, इथला स्वभाव अजून कळत नाहीये. सगळं एकदम मिक्स आहे.*

*अमितः हेवी नको टाकू.*

*मंजिरीः (फटका मारत) गप रे! बघ ना इकडं रात्री दोनलाही लोकं निवांत फिरतात आणि दुपारी दोनलाही ट्रेनमध्ये बिचकून बसतात. आपल्या समोरच्या मोठया टॉवर मध्ये रात्री बेचैन लोक येरझाऱ्या घालत असतात आणि खाली रस्त्यांवर एवढया गाडयामध्ये डिवायडर वर फॅमिलीच्या फॅमिली बिनधास झोपलेली असते. रोज कोट कोट रुपयाचे फ्रॉड इथंच होतात पण परवा अल्पेशचं रस्त्यावर पडलेलं पाकीट त्यातल्या एकशे तीस रुपयांसकट एका माणसानी घरी आणून दिलं. कसलं मिक्स आहे हे!*

*अमितः बोलत रहा. भारी वाटतय!*

दोघं हसतात.

*मंजिरीः मी काय म्हणते, हा मन्नत बंगला किती लांब असेल रे? भेटून यू जरा.*

अमित दचकून तिच्याकडे पहातो.

16. Ext/ Night/Taxi Random location

मंजिरीचा चेहरा दिसतो.

*मंजिरीः एवढं उंच गेट कशाला लावायचं? किल्ला आहे का तो? काय अर्थ आहे का याला? टॅक्सीवालेजी, सलमान के घर पे लोलो?*

पुन्हा मंजिरीचा चेहरा दिसतो.

*मंजिरीः जसा माणूस तसं घर. ह्यूमन. एकदम साधं. शेजाऱ्यांना कसलं भारी वाटत असेल. सकाळी चहा प्यायला बाहेर आलं. समोर हा शर्ट काढून बसलेला. (शांतपणे) आता जलसा.*

पुन्हा मंजिरीचा चेहरा दिसतो.

*मंजिरीः बाहेरन नमस्कार करुन आले. पण ते इकडे फक्त जेवायला येतात असं कोकणमेवा मॅगझिन मध्ये आलं होतं.*

पुन्हा मंजिरीचा चेहरा दिसतो.

*मंजिरीः तेंडल्याला भेटायचंय मला खरंतर. पण आता काय तो रिटायर झालाय, शिवाजी पार्कात वगैरे दिसू शकतो राऊंड मारताना, आई बोलल्या काल.*

टॅक्सी विविध भागातनं फिरताना दिसते.

17. Int/ Taxi/Night

ती प्रचंड खूश होउन टॅक्सीत त्याला बिलगून बसलीये.

*मंजिरीः बाप मजा आली हां आज. बाप.*

*अमितः खुश झाली ना? तू फक्त बोल, तुला अजून काय काय करायचंय? आपण करु.*

*मंजिरीः नक्की? मला ना टू व्हीलर शिकायचीये.*

*अमितः इ. उदयापासनं!*

*मंजिरीः एकदा इथल्या मोठठया ब्यूटी पार्लर मध्ये जायचंय.*

*अमितः आपण नेणार.*

*मंजिरीः मला एकदा जीन्स घालायचीये. मग आख्ख्या एरियाची पॉलिसी काढायचीये. स्वतःचं घर घ्यायचंय. मग आख्ख्या मुंबईची पॉलिसी काढायचीये. अमितः ब्रेक घे की जरा!*

*मंजिरीः बर... मग तू सांग! तुला काय करायचंय?*

*अमितः मला? आईला तिकडं बघ काय...*

ती अनाहूतपणे तिकडे बघते. तो पापी घेतो. ती लाजते. तो तिला आणखी जवळ घेतो. टॅक्सी जाताना दिसते.

## 18. Ext/ Night/Gacchi

गच्चीवर कोपऱ्यात एका बाकडयावर मंद प्रकाशात मंजिरी अमित एकमेकांच्या जवळ येतात. दोघं प्रेम करणार एवढयात रव्या आणि मंदा पळून जाताना दिसतात. दोघेही ते पहातात. त्यांना एकदम चीप वाटतं. सेपरेट होतात. एकमेकांकडे पहातात.

**SONG 2:**

*PART 1:*

१. मंजिरी फोन चार्जिंगला लावायला जाते. होत नाही. पॉईंट खराब दिसतो. फोन काढते.

२. अमित तिच्या डोक्यावर हात फिरवायला जातो. तेवढयात वडील समोर येतात. तो थांबतो.

३. अमित रात्री एकटा कुशीवर झोपून विचार करतोय.

४. आई मंजिरीचं क्रीम घेऊन चेहऱ्याला लावते. तसचं बाहेर टाकून देते. मंजिरी पहाते.

५. अमित घरात येतो. समोर पाहुणे बसलेले दिसतात. तो मंजिरीकडे वैतागून पहातो.

BETWEEN THE SONG:

IN A HOTEL ROOM: BOTH ON BED.SITTING QUIETLY.

*अमितः आपण जागा बघूया स्वतःची*

*मंजिरीः (गांभीर्य लक्षात घेऊन) काय?*

*अमितः रोज विचार करतो गं. खूप त्रास होतोय असं रहायचा.*

*(मंजिरी काहीच बोलत नाही.)*

*अमितः मला माहीतेय तू कधीच बोलणार नाही. पण मला दिसतं ना, सारखं टेशन, कोणी बघेल, कोणी येईल, कोणाला कळेल. (थांबून) मी तुला बोललो कधी मी मंजिरी? हसशील तू... (ती 'सांग' असा खांदयाला हात लावते. थांबून) मला ना स्वतःच्या घरात एकदा सगळे कपडे काढून झोपायचं होतं. एकतीस वर्ष झाली, एकदाही नाही जमलं. (ती त्याच्याकडे पहात राहीलीये.) आजही, लग्नाला दोन महिने झाले, आपल्याला या लॉज मध्ये यायला लागलं, रिकाम्या बॅगा घ्यून. का तर घरात पाहुणे आलेत. (तिच्याकडे पहात) का असं रहायचं ग?*

मंजिरी त्याला कडकडून मिठी मारते. दोघं मनसोक्त प्रेम करतात.गाणं आनंदी वळण घेतं. संपतं.

19. Int/ Night/ Naik room

एक वही दिसते. त्यावर श्री लिहीलंय. त्याखाली पंचवीस हजार प्लस आठ हजार मायनस बारा हजार खाली एकवीस हजार लिहीलेलं.

*मंजिरीः हे आठ माझं पॉलिसीचं काम सुरु होणारे असं धरुन लिहीलंय हां.*

अमित तिला खुणेनीच बोलू नको असं सांगतो. गादीखालनं पेपर काढतो. ती पहाते.

अमित लिहीतोः रोज पेपर गादीखाली ठेवायचा झोपताना, जाहीराती बघायच्या.

ती वहीवर लिहीते. इन्कम कमी आहे पण . तो लिहीतो?

ती लिहीते. मरु दे. कोकणातच घ्यू. (दोघं हसतात. शांत बसवतात.)

तो लिहीतोः हा हा हा

ती लिहीतेः तू कोळयांसारखी लुंगी घाल त्रिकोणी, लुंगीचं चित्र काढते.

अमितः येडछाप? आता?

मंजिरीः इन्कम (वरचा बाण) कसं?

अमितः डबल शिफ्ट करतो.

मंजिरीः अक्षर बाप आहे. दुसरा एरिया? जरा लांब?

अमितः चार मोठठया फुल्या मारतो.

मंजिरीः ओ के. शनिवार रविवार तू शोधायचं. म्हणजे डाऊट नाही. अमित रागाने पहातो. फुरंगटून बसतो.

*मंजिरीः (टॅप करत खुणेने) तिकडे बघ काये?*

तो हसून तिकडे बघतो.

*मंजिरीः (परत टॅप करत लिहीते.) पप्पू टाकू का टप्पू?*

हसायला लागते. लिहीते हा हा हा तो लिहीतो ढिशूम, ती लिहीते ढिशूम ढिशूम. वही भांडणाने भरताना दिसते. सगळयात शेवटी लिहीलं जातं.

उदयापासनं! दर शनिवार रविवार.

MONTAGE ON THE MUSIC THEME 'SATURDAY SUNDAY'

१. अमित तिला टूव्हीलर शिकवतोय. तिला काही केल्या ते जमत नाहीये. ती पडतीये. धडपडतीये.

२. चार आवाजांनी बनलेलं म्युझिक. ट्रेन, दारांचा आवाज, कॅलक्युलेटरचा आवाज आणि मोबाईल रिंगटोन्स.

अगला स्टेशन I अमित एका घराचे जिने चढतो. दुसऱ्या घराचं दार उघडतो. तिसऱ्या घरात आत जाऊन बघतो. कॅलक्युलेटर १५० गुणिले ५०००० चा ७५००००० आकडा येतो. एजंट विनोद नाव दिसतं फोन वाजतो.

३. अमित सकाळी उठल्या उठल्या पेपर ताब्यात घेतो. आई वडील एकमेकांकडे पहातात.

४. रात्री पेपर गादीखालनं काढतो. दोघं बसून जाहीराती वाचतायत.

५. अगला स्टेशनः धडाधड त्याच्या तोंडावर चार वेगवेगळी दार लावली जातात. मग २०० गुणिले ४५००० चा ९०००००० आकडा येतो. एजंट सुरेश नाव दिसतं फोन वाजतो.

६. मंदाच्या पार्लर मध्ये मंजिरी बसलीये. फेशियल केलंय.

७. मंदाला अमित पैसे देतो. मंदा त्याला फोटो दाखवते. अमित हसायला लागतो.

८. अगला स्टेशनः. अमित उतरतो. ३०० गुणिले ३५,००० चा १,१५,००,००० आकडा येतो.

*एजंट १ः इतने पैसे में इधर पचास स्क्वेयर फीट आयेगा.*

*एजंट २ः घराला बाल्कनी कशाला पाहीजे? बाल्कनीत उभं राहून पहाणार काय? समोरच्या बाल्कनीतल्या चड्डयाच ना?*

*एजंट ३ः (किंचीत हताशपणे) मेरा खुद का घर अभीतक नही हुआ. पैसे लेके घूम रहा हूँ पाच साल.*

*एजंट ४ः नाही दादा, एवढयात घर होणं पॉसिबल नाहीये. एवढं सोप्प नाहीये अहो.*

20. Ext/Night/Road

पावभाजीच्या तव्यावर बटर टाकलं जातं. चरर्र आवाज येतो. मयूर धन्या आणि अमित उभे आहेत. मयूरच्या आलिशान गाडीला टेकून. मयूर त्यांचा मित्र.

*मयूरः प्लेन सारखंच आहे रे. एकदा फ्लाईट घेतली की मग ऑटोपायलट!*

*धन्याः तू एक्सॅक्ट काय बनवतो?*

*मयूरः पॅसेंजर फ्लाईटसच्या विंग्सचं स्ट्रक्चर आणि डेव्हलपमेंट. पंख बनवणे.*

*धन्याः मी आईला बोललो मयऱ्या विमान बनवायच्या कंपनीत आहे, मला म्हणली कागदी विमानाच्या कंपन्या काढल्या लोकांनी?*

तिघे हसतात.

*मयूरः बरी आहे का आई? तिकडं यायला होतंच नाही. परवा दादरला आलो होतो. फ्लॅट भाडयाने दिला ना. गोरेगाव ला थ्री बी एच के घेतला.*

*धन्याः काय?*

*मयूरः हां! अरे बँकवाले हात धून मागे लागले होते. सर लोन घ्या, सर घ्या. (माजात) म्हणलं दया. फिर पार्ला का बेच दिया ना, उपर के पैसे से कार लिया, और मॅडम केलिये एक छोटा दो हजार स्क्वे फूट का लँड लिया अलिबाग मे. बोललो घ्यून टाकू. नंतर कटकट कोण सहन करणार?*

*धन्याः मी बायकोची कटकट नको म्हणून वडापाव आणतो रे कधी कधी.*

तिघं हसतात.

*मयूरः नाय रे तिनी जाम सांभाळलंय मला. मग काय? दादरचा वन बीएच के भाडयानी दिलाय, बेसिक खर्च जातो. थोडे थोडे आपले शेअर्स मध्ये टाकलेत, त्याचे आणि इन्व्हेस्टमेंट चे साठ सत्तर पडतात हातात महिन्याला.*

*धन्याः त्यातले फक्त चारशे तीस काढ. बिल आलयं.*

तिघं पुन्हा हसतात. तो पैसे देतो. धन्या बिल दयायला जातो.

*अमितः भारी यार. तुला भेटलं की एकदम गाडीत पेट्रोल भरल्यासारखं वाटतं.*

*मयूरः आपण कसले भारी? आई बाप भारी. त्यांनी दहा बाय बारात दिवस काढले म्हणून*

*आम्ही इकडं अठराव्या मजल्यावर एसीत गांड वर करुन झोपतो. इंजीनिअरिंगला जायला काचकूच करत होतो ना, बापानी समोर बसवला मला, म्हणाले मयऱ्या, सगळयात इम्पॉर्टंट आहे ना उडी. उडी मारायची. करायचे कष्ट. आत्ता दहा पंधरा वर्ष कर. मग सगळं आपोआप होतं. ऑटोपायलटचा फंडा शिकवला रे, स्वतः आर्टस चे प्रोफेसर असून. आता पण तोच विचार केला. लोकेशन, एरिया, कनेक्टीव्हीटी, सगळं डेव्हलप होणार रे दहा वर्षात.*

*तू बघतोय का नाही काही?*

*अमितः हां, म्हणजे चाललंय.*

*मयूरः मै बात करु क्या कुछ? (पाठीवर मारत. सिगरेट काढून शिलगावतो.)बाकी? वहीनी काय म्हणतायत? आमचा पप्पू आवडला का नाही त्यांना?*

धन्या येतो. तिघं हसतात. गाडीत बसतात. अमित दिसतो. मयूरचा आवाज ऐकू येतोय.

*मयूरः माझी आई श्रुतिला सारखी सांगते, हयाची लहानपणी चडडी पळवणारे दोन मित्र आहेत. तिलाही उत्सुकता आहे, चडडी पळवणाऱ्या भाऊजींना भेटायची. या घरी एकदा. बसू या. मस्त अठरावा मजला आहे, वारा आहे. बिहाईंड देअर इज बिग जंगल! कुणीही सांगावं हे मुंबईत आहे.*

अमित त्याच्याकडे गाडीत बसून कौतुकाने पहातोच आहे. समोर आरशावर विमान लटकवलेलं दिसतं.

21. Int/ Day/Office

अमित जेवून उठतो. पाटील आणि एक दोन जणं शेजारी बसलेले.

*पाटीलः घ्या, तोंडली संपवा*

*१ः पाटील काय स्टॉक क्लिअरन्स सेल लावलाय वाटतं? हे काय नाईक उठला?*

*पाटीलः त्याला हेड ऑफीसला जायचंय आज. ज्या ऑफीसमध्ये कोणालाही हेड नसतं ते हेड ऑफीस.*

अमित फो नवर बोलत बाहेर येतोय.

*अमितः हां बोला. पंधरा वर्ष जुनी आहे, बरं, अरे व्वा, चारशे पन्नास आहे, आणि कुठे? (थबकतो.) नाही हो, त्या एरियात नाही. नाही खरंच नाही. तुम्ही दुसरा एरिया सांगा ना...नाही नाही... (हसतो.) अहो नको!*

22. Ext/day/ train

अमित ट्रेन मधून विक्रोळीला उतरतो. मागे फोन कॉलचा आवाज ज्यावर तो नाही नाही म्हणतोय.

23. Ext/Evening/ Vikroli flat

रिक्षा एका रस्त्यावर थांबते. अमित आणि एक माणूस जिने चढतात. दार उघडतं. फ्लॅट दिसतो. या सगळयावर

*एजंट (व्ही ओ): पार्टी यू एस ला चाललेय, लौकर डिल करायचंय त्यामुळे. मयूर साहेब बोलले, तुम्हाला बघायचाय बोललो फ्लॅट तर दाखवू!*

अमित फ्लॅट फिरुन पहातो.

*अमितः चांगला आहे.*

*एजंटः हा ना? इकडं वरती पंजाबी आज्जी आजोबा रहातात, एक दम पीस लव्हिंग, खालती अयंगार फॅमिली एकदम पीसफुल. सकाळी सहाला कोकीळ बांग देतात. नॅचरल अलाम. (अमित हसतो.) काय कॅश का लोन?*

*अमितः अहो थांबा जरा.*

*एजंटः टोकन दयून टाका. निगोसेशन करु नंतर.*

*अमितः अहो काय भाजी आहे का ही? आणि बजेट बाहेर आहे तुम्ही बोलताय ते.*

*एजंटः साहेब, घर आणि गाडी बजेट बाहेरचंच घ्यायचं नेहमी. लक्षात ठेवा. आपण कमावतो त्याच्यासाठी. जागेत लक्ष्मी आहे.*

*अमितः माझ्या घरात कडकलक्ष्मी आहे ना पण. तिन आधी बघू दे. तिला आवडला पायजे.*

त्याला फोन येतो. मंजिरीचा आवाज ऐकू येतो. आई बाबा बाहेर गेलेत. तीन तास आहेत.

*अमितः (लगबगीने) मी करतो काहीतरी. थँक यू...तुमचं नाव?*

*एजंटः गणेश चौधरी... रिअली युवर्स!*

अमित तिथून जोरात निघतो.

24. Ext/Street/ Night

जाता जाता एका दुकानासमोर थांबतो. समोर पहातो.

25. Ext/Train/ Night

अमित गर्दीत ट्रेनमध्ये कसाबसा घुसायचा प्रयत्न करतो. कसा बसा उभा रहातो. मागे भजन चालू आहे जोरजोरात. तो त्यांच्याकडे पाहून वैतागतो. कानात हेड फोन घालतो.

26. Ext int/Chawl home/ Night

जोरात जिने चढत चढत वर येतो. दारातून आत येतो आणि त्याला दिसतं की अल्पेश आणि त्याची मैत्रीण बसलेत. मागे करण अर्जुनचं म्युझिक चालू आहे.

*अल्पेशः दिव्या इज अ मास्टर इन कोन्टेम्परारी.*

*मंजिरीः वा वा पण आधी भरतनाटयम वगैरे शिकलीय का? (अमितला) ही दिव्या, अल्पेशची फ्रेंड, मोचीकडे असते हयाच्या बरोबर. मोची. मोहन चिकणे*

दिव्या आणि अल्पेश हाताने एम फॉर मोचीची ॲक्शन करुन दाखवतात. अमित राग गिळतो.

*मंजिरीः कोरोग्राफर आहेत ते मोठठे. पिवळया केसांचे नाही का? टीव्हीवर असतात.*

*दिव्याः इटस कोरीओग्राफर ॲक्चुली. (हसते.) वॉशरुम?*

*अल्पेशः वयनी, टेक हर आऊट.*

मंजिरी तिला बाहेर घेऊन जाते. आता अमित आणि अल्पेश दोघंच.

*अमितः काय मैत्रीण का काय?*

*अल्पेशः नाय गलफ्रेंडाय. कालच झाली.*

*अमितः (चक्कर यायची बाकी आहे) मग आता काय बाहेर?*

*अल्पेशः नाय आज सिध्दीविनायकला गेलो, माथा टेकला. मग बोललो आईच्या हातचं कालवण खाऊ.*

*अमितः आई बाहेर गेलीये ना.*

*अल्पेशः म्हणूनच वयनी बोलल मी करते. (पैसे काढतो.) तू बूट काढले नाय ना, जरा पापलेट आणतो का? आण ना.*

अमित रागाने बूट काढतो आणि टॉवेल ओढून आत निघून जातो.

*अल्पेशः आता मला परत कधी सांग बनियान आणायला मग दाखवतो बरोबर.*

अमित धाडकन दार लावून घेतो.

27. Int/ home/ Night

बाथरुममध्ये बादली लाथेनी सरकवली जाते. अमित नळ सोडतो, पाणी पडतंय. मंजिरी दार लावते.

*अमितः असला मूड ऑफ झाला ना! हयाला अक्कल नाही. आपल्या भावाच लग्न झालंय तीन मैन्यापूर्वी, जरा त्यांना प्रायवसी दयावी, आपण बाहेर जावं, तर बसला त्या हिप्पोला घ्यून. काय तर म्हणे एम!*

त्याच्यासारखी एक्शन करतो. मंजिरी लटक्या रागाने फटका मारते.

*अमितः सेन्सचं नसतो ना समोरच्याला प्रायवसी दयायचा.*

*मंजिरीः तो पण तिला हेच म्हणत असेल ना. त्यांना पण वाटलं असेल, आपण बाहेर जाऊ आणि ते एकटे बसतील. आपल्याला रुम तरी आहे, त्याला तर फक्त बाकडा आहे.*

*अमितः मग काय अल्पेशला मध्ये ठेऊन झोपायचंय आज? मला तुला सरप्राईज दयायची येत म्हणून हे सगळं चाललं होतं. एक आज आणि एक नंतर, मोठठं!*

*मंजिरीः काये?*

अमित नळ बंद करतो. दोघं बाहेर येतात. तो बॅगेतनं जीन्स काढतो. वरुन एक शर्ट काढतो.

*अमितः आत्ता! आणि मी दुसरीकडं बघणार नाही.*

तीने जीन्स घातलेली दिसते. त्यावर शर्टही घातलाय. तो सगळयात वरचं बटण लावतो आणि तिच्याकडे पहातो. ती त्याला वरची साडी दाखवते आणि तू घाल असं सांगते. तो मारल्याची ॲक्शन करतो. ती एकदम वेगळी दिसतेय. दोन दात बाहेर काढून फक्त हसतीये. तो तिच्याकडे पहातो.

**SONG 3: PART 1: ROMANTIC MOMENTS OF THAT NIGHT**

PART 2: मंजिरी एक दोन घराबाहेर दिसते. मग आत चर्चा करुन पॉलिसी मिळवते.

दोघं एकत्र बाहेर खाताना दिसतात.

रात्री ती गादीच्या खालनं पेपर काढते. दोघं वाचतायत.

ती त्याचा हात डोक्याखाली घेते. दोघं झोपलेले दिसतात.

सकाळी मंजिरी आणि तो निघतात. आई आश्चर्याने तिच्या जीन्स कडे पहाते. ती ऑकवर्ड होऊन बाहेर येते. अमित रुमालानी तिचे डोळे बांधतो.

28. Int/Day/Vikroli new home

मंजिरी डोळे बांधलेली उभी आहे. खांदयावर टॅप केलं जातं.

*अमितः एय, तिकडे बघ काये...*

मंजिरी डोळयावरचं काढते. आजूबाजूला पहाते.

*अमितः आपलं आहे.*

ती प्रचंड खूश होऊन त्याच्याकडे पहाते. घरभर फिरते. खिडक्या उघडया टाकते. त्याच्या जवळ येऊन त्याला मिठी मारते.

*अमितः उडी मारायला लागणारे. पण मारायची. टोकन दिलंय मी. कन्फर्म सांगू?*

तो फोन काढतो. ती त्याच्याकडे पहात राहीलीये.

*मंजिरीः एकच मिन्ट हां.*

*त्याचा हात काढून स्वतःच्या पोटावर ठेवते.*

*मंजिरीः अमित, आपलं आहे.*

*अमितः म्हणजे?*

*मंजिरीः मूल होणारे आपल्याला.*

अमित तिच्याकडे पहात रहातो. त्याला काय रिॲक्ट व्हावं कळत नाहीये.

*अमितः आईला, मला सुधरतच नाहीये. हे कधी झालं?*

*मंजिरीः माहीत नाही. झालं, आज सकाळी कनफर्म झालं.*

*अमितः (आश्चर्य) आईशप्पथ!!*

*मंजिरीः तला आनंद नाही का झाला?*

*अमितः तू वेडी आहेस का? मी काय बोलू? (रडवेला होऊन तोंडावर हात ठेवतो.) आपल्यात एक बाळ येणारे. कसलं भारी आहे हे! ऐ, मंजिरी आपण त्याला नीट वाढवायचं हा. तू काम बीम बंद करुन टाक आता. मी पण रोज लवकर घरी यीन, आपण मस्त तुला पायजे तिकड जाऊ. बाळाला डेवलप करु हां आधीपासनं.*

*मंजिरीः म्हणजे काय? करायचंचे. बाळाला तर बघ असलं भारी वाढवू ना.*

*अमितः (एकदम) दोन्ही झेपेल का गं आपल्याला? तू अजून कमवत नाहीयेस, माझ्या सॅलरीवर आपण किती ओढणार?*

*मंजिरीः करु आपण. बघू ना.*

*अमितः मला टेंशन आलं एकदम विचार करुन.*

*मंजिरीः नको घेऊ. मी आहे ना.*

*अमितः (इमोशनल होतो.) एवढं मोठठ गिफ्ट दिलंस मंजिरी तू मला, त्याच्या बदल्यात तुला हे रिटर्न गिफ्ट देता आलं तर किती बरं होईल! पण मी एक बोलू का? (धीर एकवटत) बाळाला जन्म दयायचा असेल तर आपण आत्ता घर नको बघायला.*

पूर्ण शांतता. काही क्षण जातात.

*मंजिरीः का पण?*

*अमितः एकावेळेला दोन स्वप्न कशी बघणार? इम्पॉसिबल आहे.*

*मंजिरीः मला नाही असं वाटते पण.*

*अमितः प्रश्न तुझ्या वाटण्याचा नाहीये. आपल्याला झेपण्याचा आहे. घराचा हप्ता का बाळाचा वाढदिवस, घराचा हप्ता का शाळेची फी, घराचा हप्ता का नवीन सायकल, घराचा हप्ता का कपडे. किती वर्ष चालणार असं? आजचं दोन पैकी एक फिक्स करु, म्हणजे जे फिक्स होईल त्याच्यासाठी करुना काय पायजे ते.*

*मंजिरीः (थोडी चिडून) तुला काय वाटतं? आत्ता काय महत्वाचं आहे?*

*अमितः घर. पण आपण पहिल्यांदा आई बाप होणार आहोत हयाच्याहून मोठं काही नाही.*

शांतपणे खिडक्या बंद केल्या जातात. दाराला कुलूप लागतं. अमित आणि मंजिरी एकमेकांकडे पहातात.

*मंजिरीः टोकन अमाऊंट घेऊया परत, आता काय?*

29. Ext/Evening/chawl

दोन कुत्र्यांच्या भुंकण्याचे आवाज येतायत. शेजारनं अमित आणि मंजिरी चालत चाळीत येतात.

*अमितः (तावातावाने) आप लूट लो आपको जो लूटना ही बाकी दे दो. (फोन ठेऊन देतो.) पंधरा हजार घेणार हा. शी, सगळं जमून आलं होतं, आपलीच चूक आहे च्यायला.*

*मंजिरीः ही चूक आहे अमित?*

*अमितः (हात जोडतो.) ऐ, बाई.*

*मंजिरीः मघाचपासनं मी बघतीये. तू चिडचिड का करतोय?*

*अमितः कारण माझे पैसे जाणारेत.*

*मंजिरीः पण आपलाच डिसीजन आहे ना हा. का माझी एकटीची चूक आहे?*

*अमितः नाही नाही तू भारीच आहेस. चूक माझीच आहे.*

*मंजिरीः (जवळ जात) तू असा का बोलतोयस?*

*अमितः (ओरडत) मला वैताग आलाय कारण. एक बरं होणार असेल तर दुसरं काहीतरी आडवं येतंच!*

*मंजिरीः मला माहीत नव्हतं तुला पंधरा हजाराचा एवढा त्रास होईल! आपण नको जन्माला घालायला बाळ.*

*अमितः त्यानी पंधरा हजार परत मिळणारेत का?*

*मंजिरीः मी जमवते आणि तुला ते पैसे देते आधी. म्हणजे आत्मा थंड होईल.*

वळून निघायला लागते. अमित तिला घटट धरुन थांबवतो.

अमितः *फालतू अक्कल पाजळू नको हां. दोन लाफा लावीन.*

मंजिरीच्या डोळयात पाणी येतं. पळत पळत  घरात येते. समोर पहाते तर तिचे वडील बसलेत.

*अण्णाः या, नाईकबाई.*

मंजिरी पहाते, जाऊन अचानक गळयात पडते. रडायला लागते. अमित शांतपणे येऊन बसतो.

*आई (वडलांना): इमोशनल आहे ती.*

*अण्णाः वर्कशॉप ला आलो होतो, म्हणलं घेऊन जावं दोन दिवस. रात्रीचीच गाडी आहे. नॉनस्टॉप. (अमितला) काय जाऊ का घेऊन?*

*अमितः हो. जा ना. (हसून आत निघून जातो.)*

*अण्णाः स्वीटीला पिल्लं झाली मंजू. तीन तीन.*

*मंजिरीः (एकदम लहान होत) काय? तीन?*

*अण्णाः हो, बोरकरांच्या नातू शेजारच्या किर्तीकरांच्या टॉम्याला पप्पा म्हणतो. त्यानेच पटवलीन स्वीटीला. पोरांची नावं सिंगल डबल अन ट्रिपल ठेवलीयेत. रोज धुडगुस चाललेला असतो, पण स्वीटी मात्र आपली जेवायची वेळ झाली की दाराशी जाऊन बसते, मंजू ताईची वाट बघत. चला...येताय ना?*

30. Ext/Night/ST

मंजिरी एसटीत वडलांच्या खांदयावर डोकंठेऊन झोपून गेलीये. वडील जागे आहेत.

31. Int/Night/ Naik Home

तळव्यांना तेल लावलं जाताना दिसतं तो दचकून उठतो. आई अमितच्या तळव्यांना तेल लावताना दिसते. तो उठतो. पाय झटकतो.

*आईः तुला काय आईची अॅलर्जी आहे का रे?*

*अमितः काय पण नको बोलू. झोप गपचूप.*

32. Int/evening/ Chawl

मोबाईलच्या स्क्रीनवर सॉरी असा मेसेज येतो. अमित काहीही रिप्लाय करत नाही इनबॉक्समध्ये मंजिरीचे चार मेसेजेस दिसतात. तो काही न बोलता घरात शिरतो.

33. Int/Night/ Kokan Goan

एक कुत्री शांत बसलेली आहे. मंजिरी तिच्या तिच्या अंगावरनं हात फिरवते. समोर येऊन बसते. शांतता आहे. मागून आई येते. हातात ताटली.

*आईः धर थालीपीठ*

*मंजिरी घेते. आई बसते. मंजिरी एक घास खाते.*

*मंजिरीः चवीचं ऑलीम्पीकभरवलं ना तर तुला सुवर्ण पदक मिळेल.*

*आईः राहू दे बाई ऑलिंपीकचं. तुझं कसं चाललंय? मानवली का मुंबई? आणि जावई?*

*मंजिरीः हो. एकदम छान.*

*आईः वडील जरा ताठ वाटले होते.*

*मंजिरीः चांगले आहेत. टेम्पर लॉस आहे थोडा.*

*आईः तिकडं सगळं एकदम फास्ट असेल ना मंजू?*

*मंजिरीः खूप फास्ट. आपल्या रोहयात ज्या स्पीड नी गाडया जातात ना, त्या स्पीड नी तिकड माणसं चालतात रस्त्यावर. वेगळचं आहे सगळं. पण आपलं मस्त चाललंय. एजंट रजिस्ट्रेशन करुन आले एकटीनं जाऊन, एवढया गर्दीत!*

*आईःजिथं जाशील तिथली हून राहशील. त्यामुळं कधीच काळजी नाही वाटली मला... (थांबून) पण आता वाटतेय.*

*मंजिरीः (खाताखाता अनाहूतपणे) का गं? आता काय?*

*आईः आता दिवस गेल्यावर कसं करणार ना काम?*

मंजिरी अचानक खायची थांबतो. घास थांबतो. वर पहाते. डोळयात पाणी अडलंय.

*आईः आता विचार कसं कळलं? विचार ना! डब्यात थालपीठ नेताना नाकं मुरडायचीस. कालपासनं तीनदा म्हणालीस, भाजणी आहे का आई, जरा थालीपीठ खायची इच्छा झालीये. आईला नाही सांगायला लागत कुणी. तिला कळतं.*

जवळ जाऊन मिठी मारते. सोडवते. मंजिरी दिसत रहाते.

*आईः आता मस्त रहा इथं, आराम कर, तुला काय पाहीजे ते करुन घालीन. आणि उदया पहिले बिनिवाले बाईकडे जाऊ चेकप ला. पहिले तीन महिने फार दगदग करायची नाही.*

*मंजिरीः (स्वतःत) आई मी मुंबईला जाते उदयाच्या उदया. बाबांना सांग तिकीट करायला.*

34. Int/Day/Naik Home

सकाळ दोरी दिसते. त्यावर कपडे वाळत घातलेले. काठीने एक शर्ट काढला जातो. अल्पेश पकडतो. समोर वडील उभे आहेत.

*वडीलः अमितचा आहे तो आज मला पायजे. आज रेस आहे.*

*अल्पेशः अहो तुमी थोडेच पळणारात. आपल्याला आज अवॉर्ड भेटणाराय.*

*वडीलः काय अंघोळ केली म्हणून?*

*अल्पेशः तुमच्या बसची बात नाय आहे. हिप हॉप मध्ये अव्वल आलो आपण.*

*वडीलः लॉली पॉप ऐकलं होतं हे हिपहॉप काय आहे?*

अल्पेश शर्ट लॉकिंग पॉपिंग मध्ये काढून घेतो. आख्खा शर्ट तसाच लॉकिंग पॉपिंग मध्ये घालतो. बाहेरच्या खोलीत नाचत नाचत येतो. कपाटात जाऊन दुसरा शर्ट काढतो. गिरकी घेतो. वडलांना देतो. दारावरुन जाणारा थबकतो.

*वडीलः (आश्चर्याने.) बोनलेस आय हा. (खिशातनं पैसे काढतात.) धर धर, मजा कर पयला आला ना?*

*अल्पेशः पन्नास रुपयात प्रवास होतो, मजा नाय. तुमीच ठेवा. रिचार्ज करा. म्हणजे आमचा मोबाईल तरी वाचेल.*

वडील मारायला जातात. अल्पेश पळून जातो. वडील आत येतात.

*वडीलः काय पोरगा निपजलाय! कोणाला वाटेल हयाला एवढी हलवाहलवी येते?*

*आईः गर्लफ्रेंड पण आहे त्याला. ती पण चिकणी.*

*वडीलः काय सांगतेस?*

*आईः सुन म्हणून आली तर अवघड आहे, बाकी टकाटक आहे.*

*वडीलः (डोक्याला हात लावत)...हा पोरगा डार्कहॉर्स आहे बघ.*

*आईः झालं! नशीब पोरांची नावं तरी तुम्ही मला अल्पेश, अमित ठेऊन दिली नाहीतर तुमच्या हातात असतं, तर सी प्रिन्स, रॉयल सॅल्यूट, ओशियन्ट वॉरियर, हल्लागुल्ला काहीही ठेवली असती.*

आई तव्यावरची पोळी उलटते. पोळी उलटली जाते.

*वडीलांचा आवाजः मंजिरी नाही तर घर एकदम रिकाम वाटत ना?*

35. Int/Night/Naik Home

रात्री घरात फरशीवर एकलाडूचं पॅकेट, एकलोणच्याचा डबा, दोन पापडाचे पुडे, एकमुरंबा, दोन साडया, एकसाजूकतुपाचा डबा असं सगळं दिसतंय.

*आईः तुझ्या आईनी काय रोहयाची बाजारपेठ लुटली का काय? अगं केवढं जडे हे.*

*हा काय टॅक्सीचे पैसे देतोय?*

*मंजिरीः तो नाही आला घ्यायला.*

*आईः येऊ दे त्याला (अमित आत येतो. आई ताडकन) बाहेर हो, चल.*

अमित दचकतो.

*आईःशोभतं का हे गाढवा?*

*अमितः (मंजिरीकडे पहात) मला काम होतं.*

*आईः टॅक्सीनी आली ती एकटी.*

*मंजिरीः ट्रेन नी.*

*आईः (अमित दचकतो. आई दचकून वळते.) ट्रेन नी?*

आत निघून जातो.

*आईः (मंजिरीला) खरंच ट्रेन नी आलीस?*

*मंजिरीः नाही टॅक्सीने.*

दोघी हसतात.

*आईः (खोटया रागानं) जा आतनं पोहे घे आणि पांढऱ्या मुळयांकडे नेऊन दे. आणि जा जरा दोघं चक्कर मारुन या. नवरा बायको म्हणून काय आहे का नाही?*

*अमितः (आतून) माझा बेल्ट कुठाय?*

मंजिरी लगबगीने उठून आत जाते. अमित शोधतोय. मंजिरी त्याच्याकडे पहाते.

*मंजिरीः खरंच मिळत नाहीये का?*

*अमितः नाही माझ्या खिशात आहे, मी उगाच शोधतोय.*

तिच्या शेजारुन दाराला लावलेला बेल्ट काढून घेतो, बाहेर जातो. मंजिरी पहात रहाते.

36. Int/Night/Muley home

पोहयाची प्लेट दिसते. मंजिरी ती घेऊन आलीये. समोर सपना आणि मुळे आजोबा आहेत. मंजिरी प्लेट ठेवते.

*मुळे आजोबाः वेट, वेट, हॅव धीस पेढा.*

*मंजिरीः अगबाई लग्न ठरलं का?*

*आजोबाः सपनाला नोकरी लागली, फायनली. सॅपल फ्लॅट एक्सीक्युटीव्ह.*

*मंजिरीः वा! वा! वा! पण काही कळलं नाही हो.*

*आजोबाः अगं लोकांना फ्लॅट दाखवायचा, त्यांना त्यातल्या चांगल्या चांगल्या गोष्टी सांगायच्या म्हणजे त्यांना स्वतःचं घर घ्यावसं वाटेल. फॉर एक्साम्पल..*

*मंजिरीः ओ अहो, मला काही नको आत्ता.*

*सपनाः सुनो तो. (बदलत) वेलकम मॅम टू मार्क लाइफस्टाईल, व्ही आर इन अ एट हंर्डेड नाईन्टी स्क्वे फीट फ्लॅट.* (स्वप्नवत म्युझिक सुरु होतं) *ऑन युवर राईट इज किचन, लेफ्ट, बेडरुम अॅण्ड इनसाईड किडस बेडरुम.*

मंजिरी पहाते. तिला छान वाटतंय. आजोबांच्या घराकडे ती वेगळयाच अँगलने पहातेय.

*धीस स्कीम इज युनिक अॅण्ड थॉटफुली डिझाईन्ड. (तिला खुर्चीवर बसवते.) अॅम्पल सनलाईट,फ्रेश एअर, प्रायवसी, नो कॉमन वॉल्स, मोस्ट मॉडर्न किचन विथ म्युझिक सिस्टीम अॅण्ड बाथरुम विथ ब्यूटीफूल फिटींग्स. जस्ट अ परफेक्ट ड्रिम वर्ल्ड फॉर युवर लव्हड वन्स.*

म्युझिक पीक ला जाऊन थांबते. मंजिरी उत्साहाने टाळया वाजवते. आनंदाने तिच्याकडे पहातेय.

*मंजिरीः (मनात ठरवत) कोई भी आया है? वो चलता है?*

*सपनाः हां*

*मंजिरीः फ्री? फ्री?*

*सपनाः हां, पैसे किस बात के?*

*मंजिरीः (अतिशय उत्सुकतेने) लोग आके क्या विचारतेहे फिर?*

37. Ext-Int/ Day/ Sample flats

एका मोठठया सोसायटीचं गेट उघडलं जातं. अमित आणि मंजिरी समोर उभे आहेत. तीने गॉगल लावलाय.

*अमितः (वैतागून) तुझं काय काम आहे बोलशील का?*

*मंजिरीः (गॉगल वर करते) वी वॉन्ट टू सी सॅंपल फ्लॅट. धीस वे? ओके.*

अमित एकदम चमकतो.

एक अलिशान फ्लॅट दिसतो मंजिरी आणि अमित फिरतायत.

*फ्लॅट १: बाथरुम उघडतं. पांढरं स्वच्छ.*

*मंजिरी : (समोर पहात, स्टायलिश) जग्वार फिटींग्स?*

*एक्सीक्युटीव्हः येस.*

*मंजिरीः ग्रेट चॉईस.*

अमित जोरात डोळे मिटतो.

*२: किचन मधून ट्रॉली बाहेर येते.*

*मंजिरी : (समोर पहात, स्टायलिश) ओ फेबर?*

*एक्सीक्युटीव्हः येस.*

*मंजिरीः ग्रेट टेक्नोलॉजी.*

अमित डोक्याला हात लावून इकडे तिकडे बघतोय.

*३: भिंतीच्या रंगाचा पॅटर्न जवळून दिसतो.*

*मंजिरीः डुयरेक्स?*

*एक्सीक्युटीव्हः (गडबडतो.) आँ? येस, डयूलक्स. वेलवेट टच.*

*मंजिरीः बट इटस सेम ना? ग्रेट फिनीश, यु नो!*

अमित डोक्यावर जोरात मारुन घेतो.

मंद संगीत चालू आहे. मंजिरी किचनपाशी घुटमळतेय. अमित डायनिंग टेबलपाशी बसलाय. एक्सीक्युटीव्ह दुसऱ्या एका कपलला घेऊन बाहेर जातो. अमित ताडकन उभा रहातो.

*अमितः (चिडून) काय चाललंय हे? हाकलून देतील त्यांना कळलं तर.*

*मंजिरीः बस रे. दमला असशील. काय करु खायला? फोडणीची पोळी? का तू वॉश घेतोस आधी?*

*अमितः तू बस वॉश घेत, मी निघतो.*

अमित उठतो. मंजिरी जाऊन त्याचा हात धरते. त्याला आत नेते. दोघं बेडरुममध्ये येतात. ती दार ढकलते. कडी लावते आणि थेट त्याच्या ओठावर ओठ टेकवते. काही क्षण तसेच जातात. ती सोडवते.

*मंजिरीः हा सगळा मूर्ख पणा मी का करत्ये माहीतेय? (त्याचा हात घेऊन पोटावर ठेवते. रडवेली ) कारण मला अजूनही वाटतंय की आपण प्रयत्न करायला पायजे. आपण पण चांगली लेवलला जायला पाहीजे.*

*आपल्याला जागा नाही म्हणून नवीन घर शोधत होतो, बाळामुळे कॅन्सल केल आपण. पण एक साधी गोष्ट लक्षात नाही आली आपल्या... जिथं आपल्या दोघांना जगता येत नाहीये, त्याच जागेत बाळ जन्माला कसं घालणारोत आपण? म्हणून ट्राय करायला पाहीजे. आणि इश्यू फक्त जागेचा नाहीये, इश्यू धाडस करणायाचा आहे. उडी मारण्याचा आहे.(जवळ जात) असं काहीतरी करायच्या आहे ज्याच्याबददल आपल्याला आयुष्यभर भारी वाटेल. करु अमित ट्राय. हे जमलं ना तर ताठ मानेनी जगू, आणि नाहीच जमलं तर मी उभ्या आयुष्यात कधी तुझ्याकडे कम्प्लेन करणार नाही. आई शप्पथ.*

काही क्षण जातात. अमित भारावून तिच्याकडे पहातोय. रडता रडता हसतोय.

*अमितः निवडणुकीला उभी रहा यंदा, निवडून येशील.*

मंजिरी रडता रडता हसते.

*अमितः तिकडे बघ काये?*

*मंजिरीः माहीतेय मला.*

दोघे कडकडून मिठी मारतात. बाहेर दार वाजवल्याचा आवाज वाढतच रहातो. दोघे मिठीत तसेच. बाहेर गर्दी जमा झालीये. दार उघडलं जातं, भारलेले गर्दीतून वाट काढत अमित मंजिरी निघतात.

*अमितः बाळ जन्माला यील ते नवीन घरात. प्रॉमिस आहे आपलं थ्रोविंग स्टार.*

*******INTERVAL*******

38. Ext/ Day/ Studfarm

बादलीने पाणी कॅमेऱ्यावर फेकलं जातं. घोडयाला अंघोळ घातली जातेय. अमितचे वडील आणि एक उस्ताद मिळून अंघोळ घालतायत. वडील त्याला घेऊन बाहेर येतात. तो निथळतोय.

*उस्तादः किसको सच लगेगा, प्रिन्स चार्मिंग को साहब शूट करनेवाले थे इसको?*

*वडीलः मैने तभ्भी बोला था ये अपने पैरो पे खडा होगा.*

*उस्तादः आपका प्यार है, नाईक साब. मैं देखता था, आप रोज उसके कान में जाके कुछ बोलते.*

*वडीलः अरे वो...*

*उस्तादः क्या बोलते थे?*

*वडीलः  वो हम दोनोके बीच का सिक्रेट है. कुछ नही रे.*

घोडयाला जागेवर लावतात, त्याच्या पाठीवर हात फिरवतात. पाचशेची नोट काढतात.

*वडीलः ये लो, अपना हिसाब.*

*उस्तादः आप कब तक करेंगे ये. और आप क्या करेंगे उसका?*

*वडीलः (घोडयाजवळ जातात. त्याच्या कानापाशी बोलायला जातात)*

*(उस्ताद ला...) उधर देख! वरना मेरा सिक्रेट फूट जायेगा.*

घोडयाच्या कानाजवळ जातात.

39.  Int/ Eve/ Shinde Home

संध्याकाळी शिंदेंकडे गर्दी जमलेली आहे. मंदा मधोमध बसलीये.

*मंदाचे वडीलः मला तर मंदाला बघायला मुलगा आलाय यावर विश्वास बसत नाही. मंदा. सगळयांच्या घराच्या कडया रात्री बाहेरनं लावणारी, सायकलींची गपचूप हवा सोडणारी, गाडयांच्या सीटांवर बोलता बोलता ब्लेड मारणारी. आमच्या भांडयांच्या दुकानात लहान असताना पातेल्यात बसून गऱ्हाईकाकडे जाणारी. सगळे तिला प्रेमानं अॅटम बॉम्ब बोलतात इथं.*

*शिंदेः असू दे. असू दे. मंजिरी तू सांग जरा मंदाबददल नीट.*

*मंजिरीः (सावरत) अ... स्मार्ट आहे.*

अमितला ठसका लागतो.

*शिंदेः जा मंदा, तू जरा रणजीत रावांना फिरवून आण.*

मंदा उठते. मुलगाही उठतो.

*शिंदेः हां तू बोल...*

*मंजिरीः अतिशय उशीरा बोलते, म्हणजे विचार करुन बोलते.*

40. Ext/ Eve/Corridor

व्हरांडयातून मंदा आणि मागे रणजीत चाललेत. ती त्याला चाळ दाखवते.

*मंदाः इथं माने, कदम, काळे, खांडेकर, संडास (थांबून) गर्लफ्रेंड आहे का?*

*रणजीतः नाही.*

*मंदाः (नाराज होत) व्हॉट यार?*

दोघे जिन्यापाशी येतात. तेवढयात त्याला एकजण जोरात लाथ घालतो. तो कोलमडून खाली पडतो. हिरोच्या एन्ट्रीच्या म्युझिक वर रव्या दिसतो. कॉलर वर घेतलेला, बाहया फोल्ड केलेला. रव्या खाली येऊन त्याची गचांडी धरतो

*रव्याः आपल्या शिवाय मंदाला जो बघील ना, त्याला तिथच ग्रील करील. हिच्याशी लग्न करायचं तुला? (टप्पल मारतो जोरात) मरशील ना!!*

*रणजीतः का?*

*रव्याः हिला कॅन्सर आहे!!*

रणजीत घाबरुन मंदा कडे पहातो.

*मंदाः (हसून) हां, नेक कॅन्सर.*

*रव्याः इथनं वर जायचं, नाही बोलायचं. अन ही आवडली नाही असं नाही बोलायचं, आपण हिच्या लायक नाही असं बोलायचं. स्वतःला डाऊन दाखवायचं. हिला अप!*

*रणजीतः खरं वाटेल का?*

*रव्याः का? तू काय ब्रेड पिट ची औलाद आहेस का तुझी आय अँजेलिना जोली हाये? उदया ऑफिसला जाताना असा उचलेल ना भाडया, स्वतःला पण सापडणार नाहीस.*

अमित आणि मंजिरी चालत येतात. समोर हे तिघं.

*अमितः घरी काय सांगितलंय?*

*मंजिरीः बाहेर जातोय. (त्याला) काय रे?*

*रव्याः (बदलत) साहेब कधीही या, सत्तावीस प्रकार ठेवलेत सँडविच चे.*

अमित आणि मंजिरी निघून जातात.

*रणजीतः (निरागसपणे) पार्सल देता का पण तुम्ही?*

*रव्याः (परत हाणतो.) पार्सल पायजे? काढ झवन्या दहा उठाबशा काढ. (फान कन हाणतो.)*

मुलगा कान धरतो.

41. Int. chawl/ravi home/manda home/ Night

फाडकन मारल्याचा आवाज येतो. मंदाला वडलांनी घराबाहेर काढलंय. तिला मारतायत.

*वडील: तुझ्या बापानं मानेचा कॅन्सर काढला होता. सँडविचवाल्या, बाहेर ये भाडया!!*

*रव्याचे वडील: ऐ...शिव्या देऊ नको, कापून टाकीन.*

*वडील: अरे तू आधी सँडवीचच्या कडा नीट कापायला शीक!*

*रव्याचे वडील: बाप जल्मात सँडविचचं स्पेलिंग लिहलं का कधी भडविच्या? भांडयाच्या दुकानात, नावटाक्या आहेस ते बघ. अरे श्री लिहायला चुकतो मेल्या तू नाय त्यांच्या लग्नात तुझ्याकडनंच भांडी घ्यून तुलाच नाव टाकायला लावलं ना नावाचा कांबळी नाही.*

*वडील: अरे जा, तुझ्या पोराच्या उंचीची पिंप आहेत दुकानात, एखादयात घालून वरनं झाकण लावीन. अन भरीन बॉक्स मध्ये. ते गुदमरुनच मरेल त्यात. कुठाय तो, अप्पू राजा...त्याच्या आयचा उंदीर मारला.*

*मंदा: ओ डॅडी, प्लीज नको ना. प्लीज.*

वडील फानकन पेटवतात. रव्या भिंती आड उभा आहे. स्वतःलाही गालावर एक मारुन घेतो.

*वडील: तू गप्प बस.*

*मंदा: नो. प्लीज. आप सुनो ना.*

पुन्हा वडील फानकन पेटवतात. पुन्हा रव्या स्वतःला मारुन घेतो.

*वडील: अरे उंदरा, ये बाहेर ये...*

*रव्या: (प्रचंड रागाने) इनफ इज इनफ!! (धाडकन दार उघडून, हातात चाकू आहे.) मंदा माझीच आहे आणि माझीच राहील! (चाकू दाखवत) नायतर एकेकाला इथंच ग्रील करील.*

मंदाचा बाप घाबरतो. चाकू हवेत फिरवतो. मात्र त्याचेच वडील मागनं लाथ घालतात. तो केकाटतो.

*त्याचे वडील: ठेव आत, बटर लावायचा आहे तो.*

*मंदाचे वडील: नाही तुझ्या डोळयासमोर हिचं लग्न लावलं तर बघ.*

*रव्या: (पुन्हा उठतो.) मनानी कोणाशी पण कर, शरीरानी तू माझीच हैस. (मंदा लाजते.) आणा हिला बघायला पोरं, नाही एकेकाला ग्रील केला.*

*मंदाचे वडील: किती जणांना ग्रील करशील? लाईन लावीन दाराबाहेर पोरांची.*

*रव्या: कोण नाय करणार लग्न हिच्याशी, मंद आय ती. बोल मंदा, हॉनेस्टली बोल!!*

*मंदा: (आनंदाने) हो!*

*रव्याः काका, तुमी कितीपण पोचे पाडा, तुमच्या या भांडयावर फक्त एकच नाव आहे, रविकांत, रविकांत आणि फक्त रविकांत!*

42.Int/ chawl/naik home/ Night

आई मसाल्याच्या दोन मोठया पुडया बांधते. समोरच्या दोन बायका बसल्यात. मागे भांडणं चालूच आहेत.

*आईः आमच्या कडे रोज फू बाई फू चा एपिसोड असतो. जरा ती मंजिरीची वही दया. हिशोब लिहून ठेवते.*

दोघी हसतात. वडील कपाटातनं वही देतात.

*१ः किती झाले.*

*आईः काय दया हो, मी करते त्यातला तुम्हाला दिला. पन्नास दया.*

*२ः अहो बाहेर दीडशे तरी घेतले असते.*

*आईः बरं शंभर दया.*

बाई पाचशेची नोट देतात. आई दोन छोटया पुडया देते. पाणी पिते.

*१ः हे काय?*

*आईः पर्स मध्ये ठेवायला. हल्ली चॅन बिन ओढायचे प्रकार काय वाढलेत. जरा वाटलं ना कोणी जवळ येतयं, टाकायचा मसाला डोळयात. बुबुळं चुरचुरीतच! (वडलांना) जरा पाचशे सुटटे बघा हो.*

वडील कपाट उघडतात. सुटटे पैसे घ्यायला एक दोन कपडे आणि पर्स बाहेर काढतात. अचानक दोन ब्रोशर्स पडतात. वडील ती पहातात. एकेक पान उलगडतात. आवाज येतात.

*फ्लॅशः मंजिरीः आई रेशन कार्ड कुठाय हो? आणि वीज बिल?*

*फ्लॅशः अमितः रैवारी हिच्या शाळेतल्या मैत्रीणीनं जेवायला बोलवलंय.*

*फ्लॅशः मंजिरी फोनवरः हां, वो विसराळू है ना, तो फोन भूले है घरपे.*

*फ्लॅशः अमितः मी दिसलो तिकडं? अहो मी तर ऑफीसमध्ये होतो, काचा नीट करुन घ्या.*

43.Int/chawl/naik home/ Night

टीव्हीवर जोरजोरात धिंगाणा चालू आहे. अल्पेश पहातोय. सगळे जेवायला बसलेत.

*वडीलः बंद कर रे जरा.*

*अल्पेशः ओ थांबा, हयाच्या पुढचा ॲक्ट बघा, आपला दोस्त आहे स्लो मो स्पेशल.*

*वडीलः बंद करतो का फोडू?*

*अल्पेश टीव्ही बंद करतो. टीव्हीच्या स्क्रीनवर अमित मंजिरी दिसतात. दोघं एकमेकांकडे पहाताय.*

*वडीलः तुमी दुसरीकडं घर बघताय?*

*अमितः (थांबतो. एकदम) नाही. जनरल दोन चार बघीतली होती.*

वडील ब्रोशर समोर टाकतात.

*वडीलः ही चार आहेत. आणि याच्यावर एन्क्वायरी डेट आहे, एक महिन्यापूर्वीची.*

*आईः अमित...*

*वडीलः मध्ये बोलू नको.*

*आईः मीठ नको घेऊ का?*

मंजिरी हळूच मीठ सरकवते.

*मंजिरीः हो आम्ही बघत होतो.*

*अमितः हां...सगळयांसाठीच!*

मंजिरी दचकून त्याच्याकडे पहाते.

*अमितः आपल्याला आता गरज आहे. मग म्हणलं बघूया ना.*

*वडीलः कोणाला गरज आहे? आपल्याला तर नाही बाबा.*

*अमितः सगळयांना आहे, जागा पुरत नाही अहो आता. एकमेकांना धडकतो आपण येता जाता, वस्तू कोंबून कोंबून ठेवतो. आजूबाजूला बघा, एकीकडं पेस्ट कंट्रोल केलं तर दुसरीकडनं झुरळं बाहेर येतात.*

*वडीलः एवढी वर्ष नव्हते का हे प्रॉब्लेम? का कालच पडले आभाळातनं?*

*अमितः एवढी वर्ष मी एकटा होतो, आता बायको पण आहे ना.*

*वडीलः आमच्या बायकोनं नाही दिवस काढले. काय गं? तू नाही केलं ॲडजस्ट?*

*अमितः तेच हिच्या वाटयाला येऊ नये म्हणून. तुम्हाला तुमच्या बायकोची काळजी नसेल, मला आहे.*

*वडीलः (रागाने) ऐ, तोंड सांभाळ! (शांतता) तुमचा प्रॉब्लेम काय आहे माहीतेय? तुम्ही त्या मॉलमध्ये जाता, इकडं तिकडं मोठमोठाल्या बिल्डींगा, फाई स्टार हॉटेलं बघता, करोडो रुपयाच्या गाडयातनं जाणारी हायफाय लोकं दिसतात, मग घरी आलं की लाज वाटते, तुम्हाला ती लाज आहे ना, ती स्वस्थ बसू देत नाही, नाहीतर इथं लोकांचे संसार व्यवस्थित होतात. गावा गावात तर याहून लहान जागेत जगतात, तू मला काय सांगतो. तुम्हाला लाज वाटायला लागलीये हे कबूल करा.*

*अमितः मला लालबागची लाज कधीच वाटली नाही अन वाटणारही नाही, पण लालबागला माझी लाज वाटतेय आता. ज्या एरियात रहातो ना आपण, पाच अन सात करोड रुपयाला घर आहेत इथं. माहीतेय का?*

*वडीलः जमणारे का मग? अठरा हजार पगार तुझा.*

*अमितः इकडं नाहीच बघायचं. लांब बघणारे.*

*वडीलः आत्ता उडया माराल, घ्याल कुठंतरी काशीत अन नंतर हप्ते भरायला नाही झेपलं की याल रडत आणि ही जागा काढायला लावाल. म्हणजे तुमचं घरं होणार, आम्ही आमची जागा देऊन तिथं आश्रितासारखं रहाणार. मग होणार सुरु, बाबा इथं बसू नका आई स्वयपाक घरात लुडबूड करु नको. जागा असलेल्या आई बापांचं हेच होतं जगात.*

*अमितः ओ हे काय व्हाईट हाऊसच आहे का जे विकून अंबानी शेजारी घर मिळणाराय. इथं माझ्या मनाला माहीत आम्ही रोज कसा दिवस काढतो. काय काय ॲडजस्ट करतो.*

*मंजिरीः जाऊ दे.*

*अमितः हिच्या आधी पाहयला आलेल्या सात पोरी का नाही म्हणल्या असतील मला? उंची जास्त आहे म्हणून? नाही ना! घर पाहीलं त्यांनी गेल्या पळून! हिनं माणूस पाहीला... आणि म्हणून मला तिच्यासाठी हे करायचंय. आणि आत्ताच करायचंय. नायतर मलाही लग्नाच्या तिसाव्या वाढदिवसाला मुलानं आणलेली कुल्फी खात म्हणता यीलच की हीनी खूप सोसलं. सोसू दिलत ना पण तुम्ही? तुमच्या एका वाक्यानी तिची तीस वर्षाची फरफट कमी होईल का? केला का कधी विचार तुमी? मी तोच करतोय म्हणून घर घ्यायचंय.*

*वडीलः नाही जमणार, तोंडावर सांगतो. राग येईल. बाप व्हिलन वाटेल पण नाही जमणार. आम्हाला नाही जमलं पन्नास वर्षात.*

*अमितः प्रयत्न तर करुन पहायचे होते.*

*वडीलः (आवाज वाढतो.) एवढे दात आले असतील तर निघ आणि काय जागा शोधायची ती शोधा.*

*अमितः हे नाही होणार. मला घराची तेवढीच काळजी आहे. घर बघायचं म्हणून मी माझी रिस्पॉन्सिबिलीटी नाही झटकणार. कोणीतरी घेणारं पाहीजे ना?*

*वडीलः (आवाज आणखी वाढतो.) बापाला अक्कल नाही शिकवायची. कळलं ना!! बापाला शिकवायचं नाही!*

आरडाओरडा करत जेवणावरनं उठतात.

*अमितः (मंजिरीकडे पहात) घे, तुलाच कौतुक! सांग हयांना आणखीन आपण आई बाप होणारोत. हयानां काये त्याचं? (मंजिरीकडे पहात) जेव चल.*

वडील एक क्षण पहातात. समोर येतात.

*वडीलः आणि तरी तुम्हाला अक्कल येत नाहीये?*

निघून जातात. आई दोघांकडे पहाते. अवाक होऊन बसलीये. तिथून उठते. आत जाते. डबा घेऊन बाहेर येते. दोघासमोर उभी रहाते.

*अमितः (रागाने) काय आहे?*

*आईः साखर. आ करा.*

दोघांच्याही तोंडात कोंबते. अल्पेश शेजारी बसलाय त्याच्याही तोंडात कोंबते.

44.Int/ chawl waranda/ night

एका कोपऱ्यात अल्पेश हळूच फोनवर बोलतोय.

*दिव्याः (आवाज) मेरी अधूरी कहानी वर सँडी ने जे लिफ्ट करुन दाखवलं स्लो मो मधे, जज वॉज लाईक मॅड... (थांबून) व्हॉट हॅपन्ड?*

*अल्पेशः आपल्याला डाउट होता ना...*

*दिव्याः सँडी रात्री विनी कडे जातो ते?*

*अल्पेशः नाय, दादा आणि वयनी काय करतच नाहीत. नाय का तुला बोललो, दादा मंदाय आपला. पन ते रॉंग झालं. आपण काका होणार.*

*दिव्याः ओ वाव!!*

*अल्पेशः अन तू काकू.*

*दिव्याः नॉटी बॉय.*

45.Int/chawl waranda/ Night

फोटो दिसतात. एक रिसॉर्ट मधल्या बाल्कनीचा. एक बेडवर झोपलेला दोघांचा. एक कुरीअर चा. दोन कुत्र्यांचे. मग आंब्याच्या पेटीचा. जणू गेले दोन महिने त्या फोटोंमधनं कळावेत. वहीचा फोटो काढलेला दिसतो. अमित समोर पहातो, मंजिरी उभी.

*मंजिरीः सगळयांसाठी? का बोललास तू हे?*

*अमितः तू आता माझ्यावर चढू नको.*

*मंजिरीः आईनी आत बोलावलं मला, रात्री आपण दोघी झोपू म्हणल्यात,*

*अमितः मग आता काय करु मी, तिथं तुमच्यात झोपून तिला समजाऊ का?*

*मंजिरीः काही गरज नाही, मी तुला एवढंच सांगायला आलेय की जर त्या खूप बोलायला लागल्या तर मी बघीन बघीन आणि फाडकन बोलीन. आमच्यात भांडण झालं तर तयार रहा. गुड नाईट.*

*अमितः अरे व्वा, हे म्हणजे आधी खुर्चीखाली बॉम्ब लावायचा आणि मग सांगायचं आरामात टेकून बसं. कसली झोप लागतेय आता.*

दोघं एकमेकांकडे पहातात. वरुन आवाज येतो.

*आजोबाः अमित, ए अमित... जरा वर येतो का? काटे डुगडुगतायत.*

*अमितः आला म्हातारा काटयावर.*

अमित आणि मंजिरी आत पळून जातात. आजोबा पहात रहातात.

46.Int/Night/ home

देव्हारा दिसतो. समोर साखर ठेवलेली. आई कौतुकाने मंजिरीकडे पहातेय.

*मंजिरीः तुम्हाला झोप नाही येते का?*

*आईः (रोखून पहात) नाही.*

*मंजिरीः तुम्ही अशा बघत राहीलात तर मला कशी झोप येईल? (कूस वळवते.)*

*आईः मंजिरी, (मंजिरी वैतागून वळून पहाते.) तुझ्यावर रागावले नाही मी. उलट फार बरं वाटलं मला. आज एवढया वर्षांनंतर या घरात कुणीतरी स्वप्न बघीतलं गं.*

मंजिरी चमकते.

*आईः कुणीच बघत नव्हतं. कुणाच्या बोलण्यात पण नव्हतं. रोजचा दिवस उदया काय करुयात या पेक्षा काल काय झालं याच्यातच जायचा. साधं पुढच्या मैन्यात चौपाटीवर फिरायला जाऊ हे ही पोरांसमोर सांगताना जीभ कचरायची. (थांबते.) बघ ना, ज्यांना जन्माला घातलं, त्यांना कधीच काही देता आलं नाही. आता एकदम वाईट वाटतं गं, पण त्याचा काही उपयोग नाही. तू असं नाही ना करणार बाळाला?*

*मंजिरीः तुम्ही असं का बोलताय एकदम?*

*आईः नाही, मला तू आज प्रॉमिस कर, तू बाळाला चांगलं वाढवशील, त्याचे व्यवस्थित लाड करशील, त्याला पुढं जे करायचं ते करु देशील. मला तो जॉन्सन बेबी पावडरचा वास खूप आवडतो. आपल्या घरात असा भरपूर पायजे तो. (आठवत) माझ्या मुलांना नाही आणता आली कधीच. काय दिसायची माझी पोरं पण...अल्पेशचा तर सुदृढ बालक स्पर्धेत पयला नंबर आला होता,चोवीस बिस्कीटं खाल्ली होती गपागपा गणेशोत्सवात.*

मंजिरी हसते.

*आईः अमित गं माझा, चौदा वर्षाखालच्या मुंबई क्रिकेट टिमचा कॅप्टन होता. सलग दोन सेंचुऱ्या मारल्या होत्या एकदा. सरांनी सात हजार रुपये भरायला सांगीतले. हयांना पगार नऊशे. त्यानी मॅचच्या आदल्या रात्री जागून सगळं धुतलं होतं, घरभर ते पांढरे कपडे, ते पायाचे पॅडस, ते ग्लोज, गार्ड सगळं वाळत घातलेलं. सगळं त्याला बक्षीस मिळालं होतं, दुसऱ्याच दिवशी, त्यानी तिसरी सेंचुरी केली ना त्याच दिवशी पार्कातनं ओढत ओढत उन्हातान्हात घरी आणला होता त्याला. ते कपडे गेले, ते ग्राऊंड गेलं, आणि ते क्रिकेटही. एक तो दिवस आहे, आणि एक आजचा... त्या पोरानं क्रिकेटच नावंही नाही काढलं.*

धाडकन बॉल लागल्याचा आणि काच फुटल्याचा आवाज येतो. मंजिरी अवाक होऊन पहातेय.

*दोन वर्षामागं वल्ड कप जिंकला ना, मी पाहीलं त्याचं काय झालं होतं. तिकडं सचिननं वल्ड कप घेतला खांदयावर आणि इकडं आमचे नाईक घळाघळा रडत बाहेर पडले. अग गेली सोळा वर्ष,सायकलचंही स्वप्न बघीतलं नाही या मुलानी आणि आज तो म्हणतोय मला स्वतःचं घर घ्यायचंय. मला माहीतेय त्याचं डोक नाही हे. तुझं आहे.*

मंजिरी प्रचंड इमोशनल झालीये.

*आई बाप चिडतात रागावतात पोरांनी वेगळं ऱ्हायच म्हणल्यावर. का नाही राहू? त्यांना नाही वाटत? का लग्नानंतर अॅडजस्टमेंट रुखवताबरोबर मिळतात? ते काही नाही, तुम्ही मारा उडी, मी आहे. जे जे काय करायचंय ना सगळं करु आपण एकत्र!*

*मंजिरीः अहो, तुम्ही कसल्या सॉलिड आहात!*

*आईः हो ना? (तिच्या खांदयाला ढुसण्या देते.) उदयापासनं सगळयांना कामाला लावते. तू फक्त आराम कर आता बस!*

*मंजिरीः नाही, मी काम करणारे. आमच्याकडे आठव्या पर्यंत काम करतात बायका. आणि मी जगतेय ना? बाळही जगेल. उलट टफ होईल एकदम!*

*आईः फार टफ पण नको, त्याला काय जन्माला आल्याआल्या वजनं उचलायला पाठवायचंय का? तू काम ही कर, काळजी पण घेऊ. आणि जमलं तर मला कॉम्प्युटर शिकव, फार इच्छा आहे माझी. अल्पेशला म्हणलं मला माझं फेसबुक काढून दे. मसाल्यांची पब्लिसीटी करीन ना बसल्या बसल्या. ऐकतच नाही.*

*मंजिरीः मी देते करुन.*

*आईः सकाळी अंघोळ झाल्या झाल्या आठवण कर, चांगला फोटो काढू आपण.*

*मंजिरीः (हसत) हो. (थांबून) आई थँक यू.*

*आईः तू कशाला थँक यू. मी थँक यू. या जागेचं परत घर तुझ्यामुळे झालंय. (डोक्यावरुन हात फिरवते.) गुड नाईट आणि स्वीट ड्रिम्स.*

*मंजिरीः (हसून) बघू किती स्वीट होतायत ते!*

घडयाळाचे काटे उलटे फिरवले जातात. सहाचा गजर लावला जातो. गजर ठणाणा वाजतो. सकाळी आई दारात उभी रहाते.

*आईः आजपासून बाहेरचं खाण बंद, फालतू खर्च बंद, रोज तीन तीनदा चहा बंद, आता फक्त आणि फक्त सेविंग! आपलं टारगेट... महिना...*

*मंजिरीः पन्नास हजार.*

आईः (उत्साहाने) जोर लगा के!

**SONG 4: THE FAMILY UNITES**

मसाल्याला फोडणी दिली जाते. दारावर पाटी लागते. मसाल्याच्या किमती आणि उधारी बंद लिहीलेलं.

अमित धपाधप कुरीअर्स सॉर्ट करताना दिसतो. एक शिफ्ट संपते. दुसरीला पुन्हा काम करताना दिसतो.

मंजिरी एकेकाच्या घरी बसून पॉलिसीज समजावताना दिसते. पॉलिसीजवर सहया होतात.

कॅलेंडर वर फुल्या केलेल्या दिसतात.

मंजिरीला आई हातात दूधाचा ग्लास आणि दोन गोळया देते. मंजिरी घाबरत गपकन गिळते. दूध पिते.

घरात दोन तीन बॉक्सेस येतात. दोन तीन पोती येतात.

रात्री गादीखालनं पेपर काढला जातो. पेपरवर वेगवेगळया प्रॉपर्टीज वर गोल केलेले दिसतात.

अल्पेशच्या सगळया पोस्टर्सवर लहान बाळाचे चेहरे चिकटवलेले दिसतात. अल्पेश बघून चक्रावतो.

रात्री मंजिरी एकटी झोपलेली दिसते. अमित येतो. बँग टाकतो.

सकाळी अमित एकटा झोपलेला दिसतो. मंजिरी बॅग उचलून निघते.

कॅलेंडर वर फुल्या केलेल्या दिसतात.

**TALKIE PART:**

अमित आणि मंजिरी डॉक्टर कडे आहेत.

*अमितः (तावातावाने) मी कधीच नव्हतो प्रेग्नंट, पण मला सांगा, प्रेग्नंट बाईनी काम करावं का असं?*

*मंजिरीः चालत हो. काही होत नाही!*

*अमितः तुम्ही समजवताय का मी हिला घरी बांधून ठेवू?*

नर्स येते.

*नर्सः डॉक्टर, तुम्हाला बोलवलंय.*

*डॉक्टरः आलेच.*

*अमितः तुम्ही सांगाना पण हिला!*

डॉक्टर उठतात. त्याच प्रेग्नंट आहेत असं दिसतं. दोघे हसायला लागतात.

**SONG:**

आई लॅपटॉपवर बसलेली दिसते. एका बोटाने पाच किज दाबत दाबत स्वतःचं नावं म्हणत पासवर्ड म्हणून टाकते. जोरात ओरडते.

बँकेत नोटांच्या मशीन मध्ये नोटा मोजल्या जातात. अमित धनसंपदा सहकारीतून बाहेर येताना दिसतो.

मसाल्याला फोडणी दिली जाते. आईला ठसका लागतो. अल्पेश पहातो.

अमित रस्त्यावर समोर बोर्ड पहातो. त्याच्यावर जागांचे डिटेल्स आहेत. नोट डाऊन करतो.

मंजिरी एका ठिकाणी दमून थांबते. बाटली काढून पाणी पिते. पुन्हा चालायला लागते.

आईच्या हातात पाच हजार रुपये पडतात. अल्पेश ठेवतो. ती प्रेमाने त्याच्या खांदयावरनं हात फिरवते. तो तिला नाचायला लावतो. आई आणि अल्पेश नाचताना दिसतात.

अमित त्रेपन्न हजार रुपये मोजतो.

एका ठिकाणाहून बाहेर येतात. मागे ओन्ली वेज सोसायटी लिहीलेलं.

दुसऱ्या ठिकाणाहून बाहेर येतात. एकमेकांकडे नकारार्थी पहातात.

तिसऱ्या ठिकाणाहून बाहेर येतात. आणखी निराश आहेत.

47.Int/house/ Day

आई वडलांना डबा देता देता.

*आईः काल इतकी मस्त जागा पाहीली ना. पण बजेट!*

*वडीलः भाजी कसली आहे?*

*आईः मेथी. रमाकांतला फोन करीन म्हणते. त्याच्या जाम ओळखी आहेत ना.*

*वडीलः मी येतो.*

डबा घेऊन निघून जातात. आई पहात रहाते.

48.Ext/ marine drive/ Night

मरीन ड्राईव तिरका दिसतो. सरळ  होतो. आभाळ दिसतं. धन्या आणि अमित दोघं झोपलेत. पायाला मसाज चालू आहे.

*धन्याः आपल्या आया अन मरीन ड्राईव्ह, दोन्ही तशेच आहेत आपल्या जन्मापासनं.*

*अमितः (हसतो.) तोच तर लोच्या आहे. ती इतकी चांगली आहे की ऑकवर्ड व्हायला होतं. आई अल्पेश एवढी मदत करतायत, आता घर झाल्यावर कुठल्या तोंडानी सांगायचं फक्त आम्हाला रहायचंय म्हणून? त्यामुळे जागा नवी असली तरी हे सगळ तसचं असणारे. मग असं वाटतं, की कशाला एवढी मरमर करायची? क्शाला डबल शिफ्ट मारायची?*

*धन्याः अम्या रडू नको उगाच. एवढी मरमर करुन एक वेगळी खोली तरी मिळेल. दहा मिन्ट शॉवर खाली अंघोळ करशील. खिडकीतनं आकाश बिकाश दिसेल. अरे तुझं नशीब आहे, तुला घरात सिरीयसली घेतायत. आमच्याकडं बघ. बायकोनं लग्न केलं, वाटलं पोलिसात आहे चांदी होईल, एखाद  एल सीडी, एखाद मोबाईल, महिन्याच्या मैन्याला काहीतरी आणलं, अन मी, आपला बारा हजारात गटांगळया खातोय.*

*अमितः काहीही बोलतोयस!*

*धन्याः आई शप्पथ.*

*अमितः पिक्चरमध्ये असतात अशी लोकं फक्त. पैशे न खाणारी.*

*धन्याः बाकी माहीत नाही. आपल्याच्यानी होत नाही राव.*

*अमितः थोडं करायचं रे इकडं तिकडं, आपण थोडीचं करप्शन करतोय.*

*धन्याः नाही रे, नाही होतं. पुढं कसं होणारे माहीत नाही. पण नाही होत.*

अमित शांतपणे पहातोय. धन्याच्या पोटरीला मसाज करतोय. धन्या एकदम कळवळतो.

*अमितः काय रे?*

*धन्याः ड्यूटीचं मेडल. एकाला उडवून चालला होता. त्याला थांबवायला गेलो. धडकला आणि पळाला. साहेब बोलले, तुलाच कंड, मग घे.*

अमित त्याच्याकडे पहातो. त्याचा फोन वाजतो. तो उचलतो.

*अमितः हां आई,मामानी? कुठं पाहयलंय?*

शेजारनं पुन्हा ओरडण्याचा आवाज येतो.

49.Ext/ Day/ actual zopadpatti

एका झोपडीचं दार बंद करुन रमाकांत बाहेर येतो. समोर अमित अल्पेश उभे आहेत.

आता एका मोठया झोपडपटटीच्या तोंडावर ते उभे आहेत. बरोबर चौथा माणूस.

*रमाकांतः काय पप्पू, कसं वाटलं?*

*अमितः घरी जाऊन बोलूया?*

50.Int/ Day/ home

सगळे घरात बसलेत. आई आणि मंजिरीही समोर उभे. वडील बसलेले.

*रमाकांतः साहेब मला म्हणले, तुम्ही आणलाय प्रोजेक्ट मग हाय काय न नाय काय, परमिशन तर दयायलाच लागणार, मला म्हणले राहयचंय मला खुर्चीत. म्हणलं ओ लाजवू नका. माझ्याच पेन नी सही केली प्लॅनवर.*

*मंजिरीः काय आहे हे?*

*रमाकांतः सरकारला सिटी एकदम मस्त बनवायचीये. एअरपोर्ट रोडला जी झोपटपटटी आहे ती जाऊन तिकडं मस्त बिल्डींगा बांधणारेत. टार आपण तिथं आत्ता एक झोपडी घ्यायची. रेशन कार्ड सकट. तीन लाखाची झोपडी, तीनशे स्क्वे फीट चं घर, सहा लाखाची सहाशे फूटाचं. हाय काय न नाय काय?*

*मंजिरीः आमची तयारी आहे तीन पर्यंत एकदम भरायची.*

*रमाकांतः मग काय तर? बेस्ट!*

*अमितः मला नाही करायचं.*

*आईः आँ?*

*रमाकांतः ताई, मला माहीतेय तुला खिरापत नकोय, पण आता झालाय देव प्रसन्न तर प्रसाद नको का घ्यायला? देवाच नाव घ्यायचं अन खायचा, हाय काय न नाय काय?*

*अमितः नाही. हे चूक बरोबर लिगल इल्लीगल आपल्याला माहीत नाही. पण नाही करायचं.*

*मंजिरीः काही प्रॉब्लेम आहे का?*

*अमितः काहीही प्रॉब्लेम नाही.*

*आईः मग का नाही म्हणतोय?*

*अल्पेशः मी बोलू का? माझा कॉलेज फ्रेंड हाय ना उत्साह, त्याने पण घेतलं होत वडयाळाला...*

*रमाकांतः घ्या, तूच सांग.*

*अल्पेशः नंतर कळलं एकच झोपडी बावीस जणांना विकली होती.*

वडील कुत्सितपणे हसतात. मामा झापकन गायब होतो. अमित रागाने वडलांकडे बघतो.

*आईः तुझ्या मित्राचं नावं उत्साह आहे?*

*अल्पेशः नाय काय, तो कायम सगळयात पुढे असतो म्हणून सगळे त्याला उत्साह उत्साह बोलतात.*

अमित मात्र वडीलांकडे पहातोच आहे.

*वडीलः बरं आहे वेळेवर मावळला. हं.*

*अमितः कसं वाटतं हो आमची मजा बघताना?*

*वडीलः ऐ, याला म्हणावं गप्प बस. मला कशाला मध्ये घेतोय?*

*अमितः रोज बघता ना आमची मजा, कस वाटतं? आँ सांगा ना? कसं वाटतं?*

*मंजिरीः सोड ना तू.. (त्याला बाजूला घेऊन जातो.)*

*अमितः (समोर जातो.) रोज सकाळी उठलं ना की तुमच्या डोळयात आमच्याबददलचा अविश्वास दिसतो मला, जो तुमच्याकडे एकदम भरपूर आहे. रोज तुम्ही वाट पहात असता कधी आम्ही फसू, कधी हे सगळं सोडू, कशी आमची यात लागेल. बिनधास्त बघा. आम्ही पण नाही तुमच्या नाकावर टिच्चून घर केलं ना नावं नाही लावणार. मजा बघायचीये ना तुम्हाला. बघा. आता मी दाखवतो.*

अमित दिसत रहातो. त्यावर ढोल ताशाचे आवाज यायला लागतात.

Transition

१. टीव्हीवरच्या सिरीयल मधली छकुली मामी, हातात घरटं घेऊन उभी आहे. त्यात गणपती बसवलेला,

*छकुली मामीः घरटे माझे तुझ्या अंगणात तर्फे गणेशोत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा!*

*बोला गणपती बाप्पा...*

२. “मोरया” ऐकू येतं. चाळीच्या तिसऱ्या मजल्यावर लोक गणपती आणतात. शेजारुन मंजिरी जाते.

३. अमित मॅनेजरशी बोलतो. बाहेर पडताना कॅप घालतो. संध्याकाळच्या वेळात कुरीअर्स पोचवतो.

४. मंजिरी मसाल्याची चार पाकीटं पर्स मध्ये घालते. उठायला जाते अवघडते.

५. वडील सपनाला मोजून इस्त्रीचे कपडे देतात.

६. रात्री अमित आणि मंजिरी पेपर काढतात. जागांवर गोल केलेले दिसतात.

७. मधल्या मजल्यावर आकाशकंदील लागलेले दिसतात. मंजिरी जी वरुन निघाली होती ती आता या मजल्यावर आलेली आहे. पोट पाच महिन्याचं दिसतंय. सोबत तिचे आई वडील आहेत.

८. आई छोटी छोटी पोती एका टेम्पो मध्ये भरते. टेम्पो लांब निघून जातो.

९. अमित रेस्टॉरेंटच्या बाहेर कोपऱ्यात उभा राहून पोळीचा रोल खातो. हात झटकतो. निघतो.

१०. आजोबांच्या घडयाळात टोल वाजतात. ते खोकतायत. घडयाळ चालू आहे ना बघून झोपतात.

११. खालच्या मजल्यावर झिरमिळया लागल्यात रोषणाई केलेली. फळयावर हॅप्पी न्यू इयर लिहीलेलं. मंजिरी आता चालत खाली येते. आता साडे सात महिन्याचं पोटं दिसतंय.

51.Int/ Day/ New home

पडदा उघडतो. अमित खुर्चीवर बसलाय. मंजिरी ओटयाजवळ उभी आहे.

*मंजिरीः नंतर कळलं रे मला मी चुकून डयुरेक्स बोलले होते तेव्हा.*

*अमितः ते नाही. त्याच्यानंतर ग्रेट फिनीश बोलली होतीस तू. (दोघं हसतात.) चला निघूया?*

*मंजिरीः थांब रे. खायला करु का? का आधी वॉश घेतोस वॉश?*

दोघंही एकमेकांकडे अतिशय प्रेमाने पहातात.

51A.EXt/ Day/ New home parking

अमित आणि मंजिरी शांतपणे एकेक पायरी करत उतरतात. एकमेकांच्या हातात घटट हात धरलेला.

*अमितः घ्यायचं आपण हे.*

*मंजिरीः थोडं लांब आहे.*

*अमितः थोडं? खूप लांब आहे, एक तास ट्रेनचा प्रवास आहे. चारच तास पाणी येणारे, मार्केटला जायला दहा मिनिट लागणारेत, रस्ता पक्का नाहीये, सगळं आहे (थांबून) पण आपलं आहे. एजंटनी दिलेल्या चावीनी कुलूप उघडताना जे वाटलं ना, त्याच्यासारखं काही नाही. हेच घर घ्यायचं आपण. आपली लायकी काढली होती ना लोकांनी घ्या म्हणाव.*

एजंट येतो.

*एजंटः  तुमी फार काही बोलला नाहीत. दुसरी दाखवू का? जवळच आहे.*

*अमितः नाही. हाच फ्लॅट घ्यायचाय. पेपर्स मेल करा. चेक करतो. लोनचं बघतो लगेच.*

*एजंटः कुठनं करणारे?*

*अमितः धनसंपदा सहकारी. घरची बॅंक आहे आपली.*

*एजंटः चला, चहा घ्यू या का?*

*मंजिरीः तुम्ही व्हा पुढं, आम्हाला एक दोन मिन्ट बोलायचंय.*

एजंट निघून जातो. अमित चमकतो.

*मंजिरीः काय मग? कसं वाटतंय!*

*अमितः फारच बाप.*

अमित मिठी मारायला जातो. धडकतो. दोघं हसतात.

52.Ext/ chawl/ day

सूर्य उगवतो. मंदा निघते. बादली घेऊन टॉयलेटच्या जवळ येते. तीन वेळा हॉर्न वाजतो. जायच्या ऐवेजी तशीच बादली घेऊन खाली जाते. गाडीवर बसते. दोघे निघून जातात.

53.Ext/ chawl/ Night

संध्याकाळी उशीरा तसेच दोघे परत येतात. तिच्या बादलीत आता एकबुकेआहे. तिने कपाळाला कुंकूआणि गळयात हार घातलेला आहे. दोघे चाळीत प्रवेश करतात. रव्या आणि मंदा एकमेकांकडे पहातात.

54.Ext/ Street/ night

जोरजोरात हसण्याचा आवाज येतो. मंजिरी मिल्कशेकचा शेवटचा घोट पिते.

*मंजिरीः (हसतेय) त्यांना राग कसला आला, तिने पळून जाऊन लग्न केल्याचा नाही, ती बादली घेऊन गेल्याचा. दुपारी दोघं इतके टेन्स्ड होते. मी समजावलं.*

*अमितः तू समजावलं म्हणजे?*

*मंजिरीः व्हिटनेस मीच होते ना. मी आणि आई.*

*अमितः (खचलाय) तुम्ही दोघी मिळून मला चोर बाजारात विकणारात. तू दुपारी तिकडं गेली होती?*

*मंजिरीः हो. त्यात काये? चार महिने प्लॅनिंग चाललं होतं. कोणीच व्हिटनेस मिळेना, मी म्हणलं मी होते. आईन्ना घेतलं. अरे पार्लर मध्ये सत्तर पॉलिसी आणि दोनशे किलो मसाला खपवल्या चार मैन्यात. एकदम क्लोज फ्रेंड झाली मंदाकिनी.*

अमित हात जोडतो. मंजिरी हसते.

*अमितः अजून काही?*

*मंजिरीः एक फालूदा सांग. (तो चक्रावलाय) दुपारी रजिस्ट्रेशन केलं मग मी आणि आईंनी काय काय घेतलं घरासाठी बाळासाठी, डोहाळेजेवणासाठी. पंधरा तारखेला आहे. आपल्याच बाळासाठी आहे. चार वाजता. यायचं बर का!*

*अमितः पंधरालाच बँकेत जायचंय. लोन अप्लाय.*

*मंजिरीः कालच लेटर आलंय काहीतरी.*

*अमितः महिन्याला दहा पत्र पाठवतात. ही स्कीम ते लोन. मला सांग, बाबांना सांगितलं का आईंनी?*

*मंजिरीः हो.*

*अमितः खोटं वाटलं असेल त्यांना.*

*मंजिरीः जाऊ दे ना, आपलं बाळ नवीन घरात येणारे ना? अजून काय पाहीजे आपल्याला. तू फालूदा सांग ना.*

*अमितः ब्रेकघे की जरा.*

*मंजिरीः दोन माणसांचं लागत रे आता. आणि आठ महिने होतील आता. लवकर सांग, परत महाएपिसोड बघायचाय आज.*

कुल्फी कापली जाते. त्याच्यावर सब्जा ओतला जातो. रोझ सिरप टाकून फालूदा बनताना दिसतो.

55.Int/office/ Day

मॅनेजर त्रासून केबिनमध्ये बसलाय. समोर मंजिरी.

*मॅनेजरः अहो काम थांबवा तुम्ही. आठवा महिना लागेल म्हणताय ना?*

*मंजिरीः हो पण मी काय जाऊन घाबरवत नाही लोकांना. शेवटचे चार दिवस. मग आराम.*

*मॅनेजरः तेरा लाख टार्गेट होतं. साडे अकरा झालंय. दीड लाख होईल?*

*मंजिरीः हं. बाहेर काढलेली टूथपेस्ट आत टाकणं सोडलं तर या जगात अशक्य काहीच नाही पॉलिसी होणार आणि बोनसही. (फाईल्स हातात घेते. स्वतःत) मला चॅलेंज करतोय!*

*मॅनेजरः व्हॉट आर यू टॉकींग?*

*मंजिरीः मी एकदाच बोलते. पण जेव्हा बोलते तेव्हा दुनिया माझ्या तालावर डोलते.*

मॅनेजर पहात रहातो.

56.Int/office/ Day

मंजिरी डेस्कवर बसते. रपारप फोन लावते. शीट वर टिकमार्क होताना दिसतात. एका नावापुढे थांबते फोन लावते.

57.Int/office/ Day

अमितच्या ऑफीसमध्ये मॅनेजर उभा आहे. हातात एक छोटं पार्सल.

*मॅनेजरः ध्यान किधर है तेरा, उधर डस्टबिन के बाजू मे ये पार्सल आठ दिनसे पडा है. कल सुबह ये पार्सल डिलीवर करना है..*

*अमितः मी पाठवतो कोणाला तरी.*

*मॅनेजरः बॉस, वो लाईन तूने लिया ना डिलीवरी को. तो डिलीवरी खुद करो. तेरेको एक्स्ट्रा पैसे भी चाहीये और काम भी नही करना है ऐसा नही होगा. (थांबतो.) गुस्सा आ गया क्या? गलत बोल रहा हूँ तो बता!*

अमित शांतपणे पहातो. मॅनेजर वळतो. अमित पार्सल दुसरीकडे टाकून देतो. काहीतरी वाटतं, पार्सल पाशी जातो. पार्सल हातात घेतो. उचलतो.

58.Ext/ Shinde Home /Evening

“मी रात टाकली” गाणं ऐकू येतं. हिरव्या गार वेली सोडल्यात. मंजिरी हिरव्या रंगाची साडी घालून मधोमध एका खुर्चीवर बसलेली आहे. पुढे पुठठयाचा चंद्र केलेला. तिच्या हातात फुलांची परडी. त्यात फळं.
मंजिरी सासू आणि आई असे तिघी बसलेल्या.

*१ः मंजिरी, तीन हजारात झाली हां काल अँजीओग्राफी. देव तुझं भलं करो बाई.*

*मंजिरीः माझ्यावाटचे दोन एक्स्ट्रा गुलाबजाम घ्या हां तुम्ही.*

*पेडणेकरः नाईक बाई, काय फेसबुक वर नुसत्या ऑडरी घेताय मसाल्यांच्या.*

*आईः व्हॉटसअॅपवर पण केलाय ग्रुप. होताय का जॉईन? कुठाय फोन? का काढून घेतला सुनबाईंनी?*

सगळया हसतात. काकू निघून जातात.

*आईः रिझरवेशन करतो म्हणतायत हे नायतर प्रायवेट गाडी. बिनिवाले बाई तर म्हणल्या मला कधी एकदा मंजूची डिलीवरी करतोय असं झालंय.*

*मंजिरीः नाही हां. पुढच्या आठवडयात अॅग्रीमेंट होणारे आणि रोहयापेक्षा बाळंतपण इथं व्यवस्थित होईल. काय आई?*

*अमितची आईः हो पण या आठवडयानंतर बाहेर फिरण एकदम बंद. जरा म्हणून घरात थांबत नाही हो. सरकवल्या चपला की चालली बाहेर. (तिला) याद राख! (आईला) तुमच्यासमोरचं दम देते.*

*आईः दया दया. मी आले पाणी घेऊन! (उठून जाते.)*

*अमितची आईः अजून रागवू का थोडं? का आलाय इफेक्ट?*

*मंजिरीः परफेक्ट!*

दोघी हसतात.

PARELLAL

59.Ext/ Bank /Evening

एक फाईल उघडली जाते. रेशनकार्डची झेरोक्स, पॅन कार्डची झेरॉक्स, लायसन, घराची कागदपत्र, सुंदर अक्षरात भरलेला फॉर्म, पासबुक त्यावर पाच लाख पन्नास हजार असं सगळं दिसतं. अमित ते सगळं नीट पहातो. समोर पहातो बँकेच्या बाहेर गर्दी दिसते. कुतूहलाने त्याकडे पहात पहात आत जातो. जसाजसा तो जवळ येतोय तसा तसा त्याला काहीतरी गंभीर प्रकार आहे असं लक्षात येतं. आजूबाजूला लोक तावातावाने बोलतायत हे कळतं. तो समोर जातो. बँकेचं शटर अर्ध डाऊन आहे. पुढे दोन सिक्युरिटी गार्डस. अमित गोंधळलाय. इकडे तिकडे पहातो. गार्डकडे पहात.

*अमितः क्या हुआ?*

*गार्डः बँक बंद है अभी.*

*अमितः कब खुलेगा?*

*गार्डः मालूम नही. एन्क्वायरी शुरु है.*

*अमितः मतलब?*

*गार्डः (वैतागत) वो नोटीस देखो ना, हमको नही मालूम*

अमित शेजारी नोटीस पहातो. त्यावर लिहीलंय रिजर्व बँकेनी आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी धनसंपदा सहकारी बँकची सर्व खाती गोठवली आहेत. एकशे दहा कोटी रुपयांची थकबाकी असून यापुढे सर्व खातेदारांना महिना फक्त पाच हजार रुपये काढता येतील. अमित त्या नोटीशीकडे पहात राहीलाय. शेजारनं धाडकन शटरवर चप्पल बसते. अमित वळतो. लोकं गोळा होऊन त्यांचा आवाज वाढायला लागतो.

*१: बाहेर काढा यांना सगळयांना अन नागवं करुन मारा,*

*२: लाज नाही वाटत का ये, नातेवाईकांना कर्ज देता गपचूप*

*३: लेटर पाठवली म्हणे लौकर पैशे काढा, काल आलं लेटर. कोणाला कळणारे?*

सगळा आरडाओरडा गदारोळ माजलेला आहे. अमित पूर्णपणे हताश समोर उभा आहे. बँकेकडे पहातो डोळयात पाणी दाटलेलं. गर्दी आजूबाजूला येत चाललेली. तसाच वळतो. गर्दीतनं बाहेर चालत येतो. पुन्हा मागे वळून बघतो. डोळयातून पाणी वहातंय. तसाच मटकन रस्त्यात खाली बसतो. आजूबाजूला गाडया येऊन थांबतात. तो तसाच मधोमध बसून आहे. मान गुडघ्यात खाली घालतो.

60.Int/ Home /Evening

अमित मान गुडघ्यातनं वर घेतो. घरात पूर्ण शांतता दिसते. दार बंद आहे. टीव्ही बंद आहे. सगळे सुन्न आहेत. अमित तसाच बसलेला आहे.

*अमितः दर मैना पाच हजार म्हणजे एकशे दहा महिने, म्हणजे नऊ वर्ष. मीच नष्टर आहे या सगळयात, मला लक्षात आलंय. काहीही करायला गेलो की माझं नशीब मला धरत आणि पार मागं फेकून देतं. लोक एवढी चुकीची वागतात त्यांची भरभराट होते, माझ्यासारखनं कोणाचं एक पैशाचं वाईट केलं नाही, मग मलाच का हे? का मी मेल्यावरचं संपणारे हे?*

*मंजिरीः अमित!*

*अमितः खरंच. मी मेल्यावरच संपणारे हे. काय उपयोग आहे या आयुष्याचा? कम्प्लिट फेल गेलं ना सगळं? उगाच या नादाला लागलो आपण. मंजिरी, आता काय करायच आपण? रात्री जायचं सीफेसला आणि लोकांच्या घरांकडे बोट दाखवून समाधान करुन घ्यायच जन्मभर. काय?(रडायला लागतो.)*

*मंजिरीः (जवळ जाते. त्याचा चेहरा हातात घेते.) जे काय रडायचं ते आज रडून घे. आपल्याकडे सेव्हिंगचा एक रुपया नाही, घर नाही, आणि आता वेळही नाही. हे सगळं असं संपेल असं वाटलं नव्हतं पण ठीके. उदयापासनं आपण हा विषय बंद करुन टाकूया. बंद म्हणजे टोटल बंद. मी परवापासनं आराम करते. तू सिंगल शिफ्ट कर. आई अल्पेश तुम्ही सगळं सांभाळून काम करा. फक्त उदया सकाळी उठलात ना, की एकदा स्वतःला ताठ मानेनी आरशात बघा, कारण आपण मनापासनं ट्राय केला होता. आपल्याला हरवायला असं ऐनवेळेचं संकट यायला लागलं, नाहीतर आपण हे केलंच होत. (वडलांकडे रागाने पहाते.)*

*अमितः (रडत) पण ते नाही झालेलं*

*मंजिरीः एक स्वप्न तुटलं म्हणून काय झालं अमित? दुसरं बघता येतंच.*

*अमितः मला परत नाही बघायचं आता काही. परत नाही बघायचं.*

*मंजिरीः पण मी म्हणलं ना. या घरात हा विषय संपला. झालं समाधान? (वडलांकडे पहाते.)*

वडील बाहेर निघून जातात. अमित तसाच रडवेला होऊन बसलेला आहे. आई त्याच्या जवळ येते. त्याच्या केसांवरन हात फिरवतेय. मंजिरी आत जाते. पाणी पिते. पिता पिता अनावर रडू येतं. रडायला लागते. अमित आईजवळच बसलेला.

**BG SONG 5:**

आतल्या दाराला काहीही लावलेलं नाहीये. दोघं जागेचं पडलेले दिसतात. हातात हात आहेत.

एका बॉक्सच्या बाहेर काढलेला फ्लॉवर पॉट दिसतोय.

आई एका कुशीवर जागी आहे.

अर्धवट उघडलेल्या तांदळाच्या डब्यात पाचशेच्या दोन नोटा दिसतायत.

गादीखाली पेपर तसाच आहे.

अल्पेश बाकडयावर शांतपणे पडलाय.

अल्पेशचा बूट उलटा पडलाय, ज्याचा सोल पूर्ण झिजलाय.

वडील झोपून गेलेले आहेत.

घराच्या दारावर लावलेली घोडयाची नाल दिसतेय.

गादीखाली पेपर तसाच पडून आहे.

सगळया मजल्यावर लाईट आहेत मात्र हयांच्या एकाच घराचे दिवे बंद दिसतायत.

61.Int/ Home /Morning

मोबाईलच्या बॅटरी लोचा टोन वाजतो. मंजिरी त्याकडे पहाते. अल्पेश केस विंचरतोय.

*अल्पेशः आई, मी दुपारी जेवायला नाही हां. फ्रेंडकडे जाणारे.*

*आईः दिव्या का रे?*

*अल्पेशः पागल है का? तिच्याशी तर केव्हाच ब्रेकअप झालं*

मंजिरी वळून पहाते. केस बांधतेय.

*मंजिरीः तू बोललास का काही?*

*अल्पेशः नाय, मारलं. मधे मला बोलली आपण लग्न केलं तर कसं राहयचं,*

*माझा वॉडरोबचं काय? माझे शूज कुठे ठेऊ? मी बोललो बघू ना, करु अॅडजस्ट. वयनी नाही करत? तर बोलली ती काय अनपढाय. गावाकडची. तिकडेच वाजवली.*

दोघी अवाक होऊन ऐकतात.

*अमितः (आतून) पाण्याची बाटली?*

मंजिरी सावकाश आत जाते. अमित हातात बाटली धरुन उभा.

*अमितः आज शेवटचा दिवस हां, उदयापासनं बंद हे सगळं. नाही बोनस मिळाला तरी चालेलं.*

*मंजिरीः या माणसाला कसं कन्व्हीन्स केलंय मला माहीत. दीड लाखाचा प्रश्न आहे.*

*अमितः कुठे चाललीयेस?*

*मंजिरीः ठाकूर कॉलनी.*

*अमितः पार्सल देशील माझं तिथंच आहे. मी आलो असतो पण सभासदांची मिटींग आहे.*

*मंजिरीः येस बॉस. (पार्सल दिलं जातं. ती पर्स मधनं दोन हजार काढते.) हे ठेव. आजच्या आज चांगल्या नॅशनलाईज बॅंकेत अकाऊंट काढ. पैसे साठवायला तर पाहीजेत.*

*अमितः येस मॅडम. आणि ऐक टॅक्सीनीच जायचंय. आणि आज शेवटचं.*

मंजिरी मान डोलावते. दोघं बाहेर येतात.

*अमितः मी बॅंकेत जाऊन येतो.*

*अल्पेशः चल मला सोड कॉर्नरला, लेसेस घ्यायच्यात मला. फादर कुठायत आई?*

*आईः सकाळी सातलाच गेलेत आज. माहीत नाही!*

पुन्हा मंजिरीचा बॅटरी लोचा टोन वाजतो. ती वैतागून त्याकडे पहाते.

62.Ext/Train/Morning

मंजिरी ट्रेनमध्ये बसलेली आहे शांत. एका हातात पर्स, गळयात मोबाईल, दुसऱ्या हातात पॉलिसी पेपर आणि कुरीअर.

63.Ext/building/day

दाराची बेल वाजते. मंजिरी समोर दमून भागून उभी आहे. खूप वेळ बेल वाजवते. मग खाली पहाते. कुलूप दिसतं. त्याच ग्रील ला डोक टेकवून आपटते. मोबाईल चालू करते तो होत नाही. प्रचंड चिडलीये, संतापाने अगतिकझालीये. डोळयात राग आणि पाणी घेऊन वळते. खाली उतरते. हातातली पिशवी पडते. पार्सल उचलते. पार्सल दिसतं.

64.Ext/ another building/Day

बेल वाजवली जाते. मंजिरी मान खाली घालूनच उभी आहे. बाहेरचं जाळीचं दार तसंच आहे. आतलं दार उघडतं. मंजिरी कुरीअर आत सरकवते. कुरीअर आत घेतलं जातं.

*बाईः किती तारखेचं आहे हे? किती दिवस झाले? तुमची कम्प्लेन्ट करायला पाहीजे.*

*मंजिरीः अमित नाईक, माझ्या मिस्टरांचं नाव. ते काम करतात. बरं नाही म्हणून मी आलीये.*

*बाईः हं.*

*मंजिरीः सॉरी हां. मी येते.*

*बाईः पाणी हवंय का?*

*मंजिरीः चालेलं.*

दार उघडलं जातं. आत्तापर्यंत आतली बाई दिसत नाही. मंजिरी दारातनं आत येते. बाईनिघून जाते. मंजिरी इकडे तिकडे पहाते. अचानक समोर बाई येते. आणि मंजिरीला लक्षात येतं की ही चक्क छकुली मामीचं काम करणारी बाई आहे.

*मंजिरीः (गटागटा पाणी पिते.) ओ तुम्ही छकुली मामी आहात ना, "घरटे माझे तुझ्या अंगणात" मधल्या?*

*बाईः हो. का बरं?*

*मंजिरीः अजून एक ग्लास पाणी मिळेल ताई?*

65.Int/ Bank/ day

अमित आणि अल्पेश उभे आहेत. त्यांचे चेहरे दिसतायत. समोरुन फक्त आवाज येतायत.

*१: काल दोन जणांना अटॅक आलाय, क्रिटीकल आहेत. बऱ्याच जणांच मेडीकल अवलंबून होतं. अनेकांची पेंशन होती. प्रत्येकाचेच पैसे होते पण काल झालेल्या मिटींगमध्ये पुढचे सहा महिने तरी काही होणार नाही. सहा महिन्यानंतर रिव्हयू घेण्यात येईल तो पर्यंत थकीत कर्ज वसूल झालं तर उत्तम नाहीतर परिस्थीती आणखी गंभीर होईल.*

*२: या माणसाच्या मुलाच ऑपरेशन आहे. उदया पैसे नाही दिले तर याचा पोरगा वाचणार नाही. काय करायचं?*

*३: आमी रस्त्यावर यायचं का कदम साहेब? काय खायचं आता?*

*१: हे बघा, आपलेच पैसे आहेत, डोक्यात राख घालून काही होणार नाही. पैसे मिळणार नाहीयेत. वाट बघणं एवढंच आपल्या हातात आहे. काय करणार आपण?*

*४: साहेब, मला माहीत्ये पैशे मिळणार नाहीत, आणि माझा मुलगा जर वाचला नाही तर मी जगून काय करु? तुमी सगळे थोडे थोडे दयू शकता का?*

अल्पेश दिसतो. त्याच्या डोळयात पाणी येतं. अमितकडे पहातो. अमित त्याला जवळ घेतो. खिशातनं दोन हजार रुपये काढतो.

66.Int/ Chakuli Mami home/day

मोबाईलमध्ये चार्जिंग चालू दिसतं, छकुली मामीचे वेगवेगळे फोटो दिसतात. त्यावर मंजिरी घर पहाताना दिसते. ओव्हरलॅप आवाज. दोघी बसलेल्या आहेत.

*मंजिरीः ताई, तुमचा नवरा काय म्हणतो तुम्हाला? मामी?*

*बाईः (स्वतःत) नाहीये तो. मी एकटी असते. माझ्या मुलींबरोबर.*

*मंजिरीः मग तर तुम्ही प्रोटेक्ट प्लस घेतलचं पाहीजे. (बॅगेतून काढते.) हयात प्रिमियम डबल होतो दहा वर्षानी. म्हणजे तुमच्या मुलीच्या लग्नात तुम्ही फक्त बसायचं. खर्च आपोआप होणार.*

*बाईः आत्ताशी ती तेरा वर्षाची आहे.*

*मंजिरीः दहा वर्ष सापसूप जातील तुम्हाला कळणार पण नाही. महत्वाचं म्हणजे मे नंतर प्रिमीयम वाढणारे आणि कवर कमी होणारे सगळयांवरचं.*

*बाईः मला आत्ता काहीही नको. इन्व्हेस्टमेंट केलीये ऑलरेडी.*

*मंजिरीः बरं. (सगळी डॉक्युमेंटस आत टाकते.) मसाला?*

*बाईः  (आश्चर्याने) अगं तू काय काय विकतेस?*

*मंजिरीः विकत नाही हो. ठेवायला.*

*बाईः का पण?*

*मंजिरीः ताई, एका अनोळखी मुलीला भर दुपारी घरात घेऊन पाणी पाजलत म्हणून.*

बाई तिच्याकडे पहाते. प्रेमाने हसते.

*मंजिरीः मुंबईतल्या दोन इच्छा पैकी एकतर पूर्ण झाली. मला तुम्हाला आणि सचिन तेंडुलकरला भेटायची फार इच्छा होती. फोटो घ्यू एक?*

दोघींचा फोटो निघतो.मंजिरी अवघडून उठते.

*मंजिरीः मी तुम्हाला अॅक्चुली थॅंक्स म्हणलं पाहीजे. तुम्ही सिरीयल मध्ये म्हणता ना त्यातले निम्मे डायलॉग मारते मी इकडं तिकडं. परवा मॅनेजरला टाकला, महाएपिसोडवाला, मी एक दाच बोलते तो. गारच झाला. परत त्या एपिसोड चा तो 'सगळं मनासारखा अभ्यास करुनही कधी कधी पेपर चांगला नाही जात' असला बसलाय ना माझ्या मिस्टरांना.*

*बाईः का काय झालं काय?*

*मंजिरीः ते (आतल्या आत गिळते.) नाही काही नाही असचं.*

बाई तिच्या पाठीवर हात फिरवते.

*बाईः काय गं? सगळं ठीक आहे ना?*

*मंजिरीः (विषय बदलायचा म्हणून समोर पहाते, पेपरवर छकुली मामी दिसते.)*

*बाप आलाय हां फोटो.*

*बाईः काय आलाय?*

*मंजिरीः बाप! बाप!*

*बाईः (हसते) नवीन स्कीम लाँच झालीये. तिथंच गेले होते सकाळी. बापरे कोण घर घेणार एवढया लांब? कुठच्या कुठाय ते.*

मंजिरी ॲड कडे पहात राहीलीये. तो पेपर हातात धरते. उलटा ठेवते. निघते. दारापाशी जाते.

*मंजिरीः (शांतपणे) ताई, माझ्या मनात एक गोष्ट आहे. म्हणाना एकदा हेच होणार, असंच होणार. शिक्का.*

*बाईः (हसत) हेच होणार. असंच होणार. शिक्का.*

*मंजिरीः आणि सिगरेट नका ओढू, तुम्हाला नाही शोभत.*

दार लावून घेते. बाई ॲश ट्रे शेजारच्या मसाल्याचा पुडया हातात घेऊन त्याचा वास घेते. ती गेलीये तिकडे हसून पहाते.

67.Int/ Home/ Night

जेवायची पानं घेतली जातात. अमित खाली बसतो. मंजिरी पातेल ठेवते. आई नव्या सांडशीने पातेलं खाली घेते.

*अमितः नवीन आणली का काय सांडशी? आठवं आश्चर्य!*

*आईः  कालच काय काय घेतलं...(विषय बदलून हाक मारत) अल्पेश चल रे जेवायला!*

अल्पेश हेडफोन ऐकत डान्स करतोय. वडील मधल्या दारापाशी येतात.

*वडीलः बाहेर ये रे जरा.*

अमित वर पहातो.

*अमितः जेवतोय. काय काम आहे?*

वडील तिथेच बसतात. पिशवी उघडतात. अमितच्या हातात एक बंडल देतात. दुसरं मंजिरीच्या हातात देतात. दोघं अवाक आहेत.

*वडीलः भगदाड मोठं आहे, पण या आपल्याकडनं चार विटा. (दोघं क्लूलेस) पन्नास आहेत. पैसे हवे होते ना तुम्हाला? घ्या. फक्त आजपासनं आयुष्यात एक गोष्ट लक्षात ठेवायची. तुझी कधीच काही चूक नव्हती. तुझी एकच चूक की तुझ्या लाईफमध्ये बाप नावाचा घोडा थोडा लंगडा आहे. त्याला पळवताही येत नाही अन गोळीही घालू शकत नाही. पण त्यानं थोडे थोडे करत करत जमेल तसे पैसे जमवलेत.*

*आईः अहो काय बोलताय?*

*वडीलः रोज बघायचो ना मी. मनातल्या मनात बोलायचो हे काय करणार? उंटाच्या गांडीचा मुका घ्यायला निघालेत. घ्यू दे. एकदोन दा घर मिळता मिळता हुकलं तेव्हा जरा बरंही वाटलं पण नंतर एकदा म्हणलं एखादा मोठा झटका बसला तर वाट लागेल. काल माझ्या डोळयासमोर तोच बसला, बाहेर गेलो आणि वाटलं, बाकी काही नाही देता आलं तर आपल्या पोराला धीर तर नक्की देऊ शकतो आपण.*

अमित उठातो. बापाकडे पहातो.

*वडीलः आमचा प्रॉब्लेम काय आहे माहीतेय? डेवलप होणाऱ्या शहरात आमी स्वतःला डेवलप करायलाच कमी पडलो. शहराच्या टोकाला घरं घेणाऱ्यांना नावं ठेवली, हा एरिया वाईट, तिकडं तर जाणारच नाही, सगळी मिजास केली, पण आपल्याच पोरांना मोठेपणी तीच घर*

*लागतील, याचा  बारीकसा अंदाज पण आम्हाला आला नाही. म्हणूनच फेल मी आहे रे. तू नाही.*

अमित बापाला कडकडून मिठी मारतो. मंजिरी आणि आई एकमेकांकडे पहातात. वडील त्याच्या कानाजवळ जातात.

*वडीलः (त्याच्या कानाजवळ जातात) प्रिन्स चार्मिंग! तेरा जनम जितने के लिये हुआ है, बैठने के लिये नही.*

68.Ext/ Corriodr/Night

आई आणि वडील बाहेर कॉरीडॉर मध्ये उभे आहेत.

*आईः कुठनं आणलेत?*

*वडीलः आणले.*

*आईः तरी?*

*वडीलः माझं एक स्वप्न होतं मालती, घोडी विकत घ्यायचं.*

*आईः घरात दोन दोन असताना?*

*वडीलः तेच, मला माहीती होतं त्याची टिंगल होणार, म्हणून कोणालाही बोललो नाही. मला ना मरायच्या आधी स्वतःच्या मालकीच्या घोडीवर बसून संध्याकाळच्या गार वाऱ्यावर रेसकोर्सला राऊंड मारायची होती. असा मंद लाईट, वारा, मी आणि माझी कॅसा ब्लांका. नावं ही ठरवलं होतं. उस्तादला दर महिना पाचशे रुपये दयायचो. काल पहिल्यांदा वाटलं च्यायला आपल्याला घोडी घेणं इतकं क्लोज असेल तर यांना घर घेण किती क्लोज असेल? (वळतात) हा आपला बोनलेस, (त्याला) इकडं ये. (तो जातो.) हयाला पण वाटत असेल की काहीतरी करावं.*

*अल्पेशः आपलं एकच एम आय, डान्स क्लास.*

*वडीलः तू सांग, आपल्याला झेपेल त्या डान्स क्लासला घालू आपण.*

*अल्पेशः ओ, जायचं नाय, काढायचाय आता आपल्याला.*

*वडीलः होशील होशील मोठ्ठा डान्सर होशील.*

*अल्पेशः कोणाला व्हायचंय, आपण कोरीवग्राफर होणारे. मोची सारखा.*

*आईः केस पिवळे केलेस तर घरात घेणार नाही लक्षात ठेव.*

तिघेही हसतात.

अल्पेशः दादा वयनी कुठाय?

आई समोर बोट दाखवते.

69.Int/chawl/naik home/ night

तांदळाचा डबा उघडला जातो. दोन बंडलं आत पडतात. अमित मंजिरी एकमेकांकडे पहातात. गादीवर बसतात.

*दोघंः ॲक्चुली तुला...*

*अमितः बोल.*

*मंजिरीः तुला एक सरप्राईज दयायचं होतं.*

*अमितः मलाही.*

*मंजिरीः दे.*

*अमितः तू दे आधी.*

*मंजिरीः दोघांनी डोळे बंद करुया एक दोन तीन म्हणून, बघूया.*

*अमितः डन.*

*मंजिरीः एक, दोन , तीन.*

अमित गादी खालचा पेपर काढतो. मंजिरी त्याच पेपरला हात लावायला जाते. दोघांचा हात हातात येतो. दोघं डोळे उघडून एकमेकांकडे पहातात. दोघांनाही एकमेकांना पेपर दाखवायचाय कळतं. मधोमध पेपर ठेवलेला दिसतो. त्यावर छकुली मामी.

*मंजिरीः दोन पावलं मागं गेलोय, कदाचित उडी जास्त चांगली मारता यील.*

*अमितः उदया जाऊया, बुक करु. एक वर्ष आहे. अजून काम करु. करु मंजिरी आपण. मला काल लक्षात आलंय रात्री, मला स्वस्थ बसणं अवघड आहे.*

*मंजिरीः बास, अजून काय पाहीजे?*

*अमितः पाहीजे ना!*

अमित हसतो. खिशातनं हेडफोन्स काढतो. ती त्याच्याकडे पाहून हसते.

दोघं झोपलेले दिसतात. दोघांनी हेडफोन्स लावलेत. एक अमितच्या कानात एक मंजिरीच्या. मागे गाणं चालू आहे “ये कहाँ आ गये हम, यू ही साथ साथ चलते”

70.Int. society office. day

वन बीएचकेफ्लॅटचा ले आऊट दिसतो. पैसे दिले जाताना दिसतात, पावती फाडली जाते.

71.Int/ home/ Day

सकाळी वडील बाहेर जायच्या तयारीत आहेत. आई येऊन ठाक  ठाक ठाक काठी मारते.

*आईः पुरण शिजलंय, सांगीतलेलं बरं.*

वरनं दोन दा काठी मारली जाते. वडील चप्पल सरकवतात. अमित बाहेरन येतो. त्यांना आत घेऊन बसवतो. मंजिरी शेजारी उभी.

*वडीलः मला लेट होईल, आज रेस आहे.*

*अमितः (पेढयाचा बॉक्स काढतो.) आई बाहेर ये. आत्ताच्या आत्ता.*

*(आई हात पुसत बाहेर येते. आई वडील समोर उभे.) घर बुक केलं. लांब आहे पण बजेट मध्ये आहे. पझेशन ला एक वर्ष आहे. आता उडी मारलीये.*

वाकून नमस्कार करतो. आई वडलांना काय रिॲक्ट व्हायचं कळत नाहीये.

*वडीलः (पेढा तोंडात टाकत, त्याच्या खांदयावर हात ठेवतात) आठ हात आहेत कमवायला, अरे बचेंगे तो और भी लडेंगे. (निघतात. जातान मंजिरीला) आज कुठला लागेल सांग?*

*मंजिरीः बाबा, प्रिन्स चार्मिंग, शुअर शॉट, जॅकपॉट!*

वडलांच्या डोळयात हलकं पाणी तरळतं. तिच्या डोक्यावरनं हात फिरवून हसत निघून जातात.

*अमितः मी आलो जरा...*

71A.Int/ Dhanya home/ Day

पुन्हा आरशासमोर टोपी चढवली जाते. युनिफॉर्मवर धनंजय मांद्रेकर असं नावं दिसतं. बत्तीशीच्या धन्या वळतो. त्याची बायको बाहेरुन आत येते.

*स्मिताः आज लेट?*

*धन्याः  फ्रान्सचे अध्यक्ष येणारेत.*

*(आतून) आईः भेटले तर म्हणावं, आमच्या आयीनी निरोप दिलाय.*

*धन्याः काय? चहा टाकलाय?*

*(आतून)आईः आमचे पगार वाढवा. कसं होणार बारा हजारात?*

*धन्याः आई तुझ्या हातात असतं तर तू हा प्रश्न घ्यून युनो मध्येही भांडली असती. बाकीच्यांच कसं होतं?*

*बायकोः बाकीचे हुशार असतील पण!*

*अमितः येऊ का आत?* (धन्यासमोर उभा रहातो. पेढा देतो.)

*अमितः घर झालं धन्या.*

धन्या कडकडून मिठी मारतो.

*अमितः तुझ्यामुळे.*

धन्या आणि बायको आश्चर्यानी पहातात.

*अमितः तू बोलला नसता तर मला कधीच कळलं नसतं की माझी आई आणि बायको यांचा सपोर्ट किती इम्पॉर्टंट आहे. घ्या ना वहीनी पेढा.*

ती ओशाळून घेते.

*अमितः आपल्याबरोबर खांदयाला खांदा लावून कोणतरी उभं आहे, हे फीलिंग फार महत्वाचं आहे. नाही वहीनी?*

ती ओशाळून वर पहाते.

*धन्याः स्कीम कशी आहे?*

*अमितः बाप आहे. सात बिल्डींग, प्रत्येकीला फुलाचं नाव, मधोमध क्लब हाऊस, स्विमिंग पूल, स्पा, मी म्हणलं आय झवलान राहयचं कधी. परत मॉडयूलर किचन  आहे, टॉयलेट बाथरुम मोठठं आहे. बेडरुमला बाल्कनी आहे. जॅग्वारची फिटींग दिलीत अहो आणि वेलवेट टच कलर.*

तो बोलतोय त्यावरचं स्लेट येते

## ****ONE YEAR LATER*****

नवीन घराचे छान छोटे छोटे भाग दिसायला लागतात. लाईटींगच्या माळा दारावर लावलेल्या दिसतात. बेसिन दिसतं. छोटी ड्रॉइंग रुम दिसते, किचन दिसतं आणि आत बेडच्या शेजारी पाळण्यात शांतपणे एक लहान बाळ झोपलेलं आहे. त्यांच्या स्वप्नातल्या घराचं जणू हे मिनिएचर आहे.

72.Int/ new Home/ Evening

रात्री सगळी लोकं गेलेली आहेत. मंजिरी दमून भागून दिवाणखान्यात येऊन बसते. अमित फोनवर आहे.

*अमितः मयऱ्या मंजिरीलाही भेटायचंय पप्पूच्या मित्राला. खरचं ये! चौथा मजला कचच्कचीत उजेड, होल वावर इज अवर! (हसतो.) थँक यू डार्लिंग! (फोन ठेवतो.)*

*अल्पेशः हिट हाय आँ फ्लॅट. एकदम अॅक्चुल घर वाटतंय.*

*आईः माने बाई कधी येणार विचारायला काठी घेतली मी चुकून. झोपली का ग मीरा?*

*मंजिरीः हो, मघाशीच.*

*वडीलः काय एकसे एक गिफ्टस आल्यात. पण तू स्पेशल गिफ्ट नाही ना पाहीलं?*

अमित मान डोलवतो. वडील बॉक्समधनं अँटीक घडयाळ काढतात. मुळे आजोबांचं.

*वडीलः जाताना थांबवलं, म्हणले अमित इथं येणार नाही, घडयाळ तर त्याच्याकडं राहू शकतं.*

घडयाळ लावलं जातं. दहा वाजतात. अमित त्याकडे पहातोय. मनापासनं हसतो. एक क्षण जातो.

*आईः ऐ बाई, चला आम्ही निघतो आता.*

*मंजिरीः (एकदम) निघतो म्हणजे?*

*आईः जातो गं. दहा सतराची लोकल आहे लास्ट.*

*अमितः मला नाही कळलं!*

*आईः तू आता माझ्यावर करवादू नको, पण यांना लालबागची सवय, याचा पिवळया तिथंच क्लास घेतो. आणि मला या वयात यांना सोडून रहाणं शोभणार नाही. तुम्ही रहा ना इथं मस्त.*

*मंजिरीः याला काय अर्थ आहे?*

*आईः बाळा! असं काय करते? (गालावरनं हात फिरवत) या जगात प्रत्येकाला शांतता पाहीजे असते. फक्त ती एकदम कमी जणांना मिळते. एवढया कष्टानं ती तुम्ही मिळवलीये, तर आम्हाला ती काढून नाही घ्यायची. (अमितला) आणि आम्ही काय पळून नाही चाललो, पुढच्या रविवारी याना आमच्याकडे मस्त कालवण खायला.*

*अमितः आई, तू नातेवाईकअसल्यासारखं बोलू नको हां. मी आत्ता सगळं सोडून यीन.*

*आईः गप रे, खरंच निघतो.*

*मंजिरीः मी काय म्हणते, तुम्ही प्लीज आज तरी रहा. प्लीज. नाही म्हणू नका. प्लीज.*

*आईः (दोघांकडे पहात) ठीके. दोन गादया दे बाहेर*

गादया घातल्या जाताना दिसतात. आई वडील आणि अल्पेश शांतपणे पडतात.

## 73.Int/ new Home/Night

बाहेर सगळे झोपलेले दिसतात. मंजिरी आणि अमित आत येतात. पूर्ण शांतता. पाळण्यात बाळ आहे.

*मंजिरीः फॅन मोठा करतोस का जरा?*

अमित अत्यंत आरामात फॅन मोठा करतो. फॅनचा स्पीड वाढतो. अमितचं तिकडे लक्ष नाही. मंजिरी मात्र जुना दिवस आठवून त्याच्याकडे पहात रहाते. तो बेडवर पडतो. मंजिरी त्याच्या जवळ येते. दोघं पडतात. ती त्याचा हात डोक्याखाली घेते. दोघं एकमेकांकडे पहातायत.

*अमितः कसं वाटतंय?*

*मंजिरीः फारच बाप.*

दोघं हसतात. तसेच झोपून जातात.

74.Int/ new Home/Day

उबदार, प्लेझंट सकाळ. सूर्य उजाडतो. बाल्कनीचं दार किलकिलं होतं. अमित आळसावून दार उघडतो. मागून मंजिरी येते.

*अमितः पिल्लू उठलं?*

*मंजिरीः कुंभकर्ण आहे ती. तासभर आहे अजून. आईंचा आत्ता आईंचा व्हॉटसअॅप आला होता. पोचले.*

*अमितः हं. (तिच्याकडे पहात) मंजिरी, झालं ग. थोडं बाहेर का होईना, आपलं स्वतःचं घर झालं. (आजूबाजूला पहात) पण अजून काहीच झालं नाहीये, कोणी येईल का ग इकडं रहायला?*

*मंजिरीः येतील. आपल्यासारखीच असतील ना अजून. उडया मारणारी. आणि अभी तो शुरुवात है. अजून तर काय काय करायचंय आपल्याला!*

*अमितः म्हणजे?*

*मंजिरीः आता फोर व्हीलर शिकायचीये ना मला.*

*अमितः अगं, ब्रेक घे की जरा.*

*मंजिरीः गपे, माझं ठरलंय. विमानात पण बसायचंय या वर्षात.*

*अमितः आणखीन?*

*मंजिरीः मीराला स्विमिंग शिकवायचंय. आणि त्या तेंडल्याला भेटायचंय. कितीवेळा गेले पार्कात दिसलाच नाही.*

अमित हसतो.

*मंजिरीः अरे हां. आईनी जाताना एक एन्व्हलप दिला. मला म्हणल्या काल दयायचा राहीला.*

एन्व्हलप घेऊन येते. अमित उघडतो. जुनं घडया पडलेलं सचिन तेंडुलकरचं पोस्टर आहे. अमित ते बाहेर काढून समोर धरतो. त्याकडे पहात रहातो. थक्क होतो. त्याचे डोळे भरुन येतात.

*मंजिरीः मला म्हणल्या त्याला सांग, मी जपून ठेवलं होतं. (पोस्टरकडे पहाते.) ही त्याची सही आहे ना? तू भेटलायस त्याला?*

*अमितः (पोस्टर कडे पहात, आठवणीने रडवेला होत.) सत्तर बॉल एकशे तीस मारले होते, मास्टर ने स्वतः येऊन ऑटोग्राफ दिला होता. शेक हॅंड केला होता. मी दिवसभर हात धुतला नव्हता.*

हसता हसता रडायला लागतो. पोस्टर वर टप टप थेंब पडतायत.

त्यावर वाक्य लिहीलंय डिअर अमित, चेझ युअर ड्रिम, सचिन तेंडुलकर.

दोघं एकमेकांना कडकडून मिठी मारतात.

*अमितः थँक यू... थ्रोविंग स्टार!*

*मंजिरीः यु आर वेलकम... प्रिन्स चार्मिंग!*

कॅमेरा मागे मागे जातो. आधी बाल्कनी, मग दोन मजले, मग पूर्ण बिल्डींग, मग परिसर, तेव्हा लक्षात येतं की मधोमध असलेल्या या बिल्डींगच्या आजूबाजूला अजून काहीही झालेलं नाहीये. पण त्याच मधोमध असलेल्या बिल्डींगच्या आवारात आणखी एकसामानाचा टेम्पो आत येतो. आणि शेजारी गाडीतून एककपल उतरुन बिल्डींगच्या दिशेनी चालायला लागतं.

*******Endscroll*******

१. घडयाळात सहा वाजलेत. अमित मंजिरी पाणी भरतायत.

२. धन्याची बायको अमितच्या आईला मदत करताना दिसते. अमितची आई कम्प्यूटर समोरच आहे.

३. अमित लोकलच्या गर्दीत उभा आहे. शेजारी लोकभजन गातायत. तो हसून त्यांच्याकडे पहातोय.

४. मंजिरी बाळाला घटट बांधून आणि टूव्हीलर वरुन चाललेली आहे.

५. वडील उस्तादला पुन्हा पाचशे रुपये देतात.

६. मोठठया कपाटात तिघांचेही कपडे नीट मांडून ठेवलेले आहेत.

७. अल्पेश डान्स रेव्हल्युशनचा बोर्ड दिसतो. खाली अल्पेश हसत उभा आहे. दिव्या समोरुन येऊन सॉरी म्हणते. अल्पेशपण सॉरी म्हणतो.

८. दोघं शांतपणे टीव्ही बघतायत. बघता बघता ती त्याच्या मांडीवर डोकंठेऊन झोपून गेलीये. अमित मुलीला कुशीत घेऊन टीव्ही पहातोय.

९. छकुली मामी आणि सिरीयलचे हिरो हिरोईन दिसतात. त्यांच्या हातात बाळ. टिव्हीच्या वर घडयाळ दिसतं. आणि त्या घडयाळाच्या बरोब्बर वर सचिनचं पोस्टर फ्रेम केलेल, त्यावर लिहीलंय ‘डिअर अमित, चेझ युअर ड्रिम्स, सचिन तेंडुलकर’

*******END CREDITS*******

**क्षितिज पटवर्धन**

**७ मार्च २०१४ संध्याकाळ ५ वाजून ४२ मिनिटे**